आंदोलन

वर्ष 16। अंक 09। मूल्य 25/

शाश्वत विकासासाठी

एप्रिल 2025 | पृष्ठे 36

NAPM @ 30

संघर्ष - निर्माण साथ साथ!
जनसत्ता संघर्षातून!!
सुराज्य निर्माणातून!!!

आंदोलन

शाश्वत विकासासाठी

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे
मासिक संवाद माध्यम

शाश्वत विकास न्यासाचा उपक्रम

वर्ष सोळावे, अंक नववा

एप्रिल २०२५ ⌘ मूल्य रु. २५/-

- **संपादक**
  मेधा पाटकर

  संपादक मंडळ
  प्रा. सुभाष वारे, मीनल उत्तुरकर,
  अमेय तिरोडकर, सुनीती सु. र.,
  सुरेश सावंत, साधना दधीच,
  मिलिंद चंपानेरकर, राज असरोंडकर
- **कार्यकारी संपादक**
  संजय मंगला गोपाळ
  ९८६९९८४८०३
- **व्यवस्थापक**
  शरद जोशी
  ७०४५००३६४०
- **पत्रव्यवहार व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**
  आंदोलन शाश्वत विकासासाठी
  द्वारा शरद जोशी
  बी/९, मेघमल्हार, गावंड पथ,
  मल्हार सिनेमा जवळ, नौपाडा,
  ठाणे (प.) ४००६०२
- **अक्षर मांडणी**
  पंकज गुरव
- **मुखपृष्ठ मांडणी**
  प्रतीक ठाकूर
- **मुखपृष्ठ व आतील छायाचित्रे**
  'आंदोलन'च्या संग्रहातून व इंटरनेटवरून
- **मुद्रणस्थळ**
  श्री गुरुकृपा प्रिंटर्स, माहिम, मुंबई - १६
- **शाश्वत विकास न्यासाचे कार्यालय :**
  द्वारा - ६, राघव, श्री रघुराज सोसायटी,
  सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०
- दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होते.
- अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

NAPM @30

हैदराबाद राष्ट्रीय अधिवेशन विशेष अंक

संपादकीय/संकल्प: संघर्षाचे आव्हान, पुनर्निर्माण आणि पर्यायांची प्रतिज्ञा/ ३

युवा मन/NAPM हैद्राबाद अधिवेशन आणि बरंच काही/**सागर सुतार**/ ७

संमेलन उद्घाटन/लोकशाहीच्या संरक्षणासाठी संवैधानिक ते पर्यावरणीय न्यायाची लढाई आवश्यक!/**वैभवी प्रेमलता संजय आढाव**/ १०

खास वृत्तांत/NAPM शी संलग्न देशभरातील विविध जन आंदोलनांची वाटचाल संघर्ष, प्रतिकार आणि नव्या दिशांचा वेध/ **मीनल उत्तुरकर**/ १८

ठराव/हैद्राबाद येथील एन ए पी एम @ 30 संमेलनात पारीत झालेले ठराव/**सुहास कोल्हेकर**/ २४

राजकारण/कार्यकर्ता शक्ती आणि सत्ता मिळवतो लोकांकडून, जनआंदोलनांकडून!/**मिनाक्षी नटराजन**/ ३०

निवड/संमेलनात निर्वाचित National Working Group/ ३३

कृपया लक्षात ठेवा वर्गणीचे दर वाढविण्यात आलेले आहेत

कार्यकर्ते/विद्यार्थ्यांना वर्गणीत सवलत मिळू शकेल.
खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर सवलतीसाठी संपर्क साधा.
आंदोलन शाश्वत विकासासाठीची वर्गणी भरा आता ऑनलाईन!

Name of A/c.: Andolan Shashwat Vikasasathi

Bank Of India, Naigaum Cross Road Branch, Dadar (East), MUMBAI 400014. Current A/c No.: 003520110001099, IFSC: BKID0000035

वर्गणी ऑनलाईन जमा केल्यानंतर खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर मेसेज करून लागलीच कळवा! ईमेल : andolan.magazine@gmail.com

मोबाईल : 9869984803/ 9869392013/ 7045003640

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय - मराठी संवाद माध्यमाचा अंक - वर्ष २९ अंक ४

कार्यालय : आंदोलन शाश्वत विकासासाठी, द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.

वार्षिक वर्गणी - व्यक्ती - रु. ३००/- संस्था - रु. ४००/-

१२ वर्षांची वर्गणी - व्यक्ती रु. ३,०००/- संस्था - रु. ४,०००/-

• आपण एकाहून अधिक वर्षांसाठी वर्गणी भरू शकता. • चेक/ड्राफ्ट 'आंदोलन शाश्वत विकासासाठी' ह्या नावाने काढावा. • वर्गणी शक्यतो चेक/ड्राफ्टनेच पाठवावी • तसे शक्यच नसल्यास मनिऑर्डरने पाठवावी.

• चेक/ड्राफ्ट/मनीऑर्डर ठाण्याच्या पत्त्यावरच पाठवाव्या.

संपादकीय

संकल्प: संघर्षाचे आव्हान, पुनर्निर्माण आणि पर्यायांची प्रतिज्ञा

हैदराबाद येथे झालेल्या NAPM च्या ३० वर्षेपूर्तीच्या राष्ट्रीय संमेलनात करण्यात आलेला हा संकल्प अर्थात NAPM's Hyderabad Declaration!

आम्ही त्या नद्या आहोत, ज्यांना कोणी बांधू नाही शकत,
आम्ही तो समुद्र आहोत, ज्याला कोणी खाणीत नाही बदलू शकत,
आम्ही ते जंगल आहोत, ज्याला कोणी कापू नाही शकत,
आम्ही ती जमीन आहोत, जिला कोणी हडप नाही करू शकत, नष्ट नाही करू शकत!
आम्ही ते लोक आहोत, जे वाकत नाहीत, थांबत नाहीत आणि मिटवले पण जाऊ शकत नाहीत!

तीस वर्षांपासून आम्ही एकत्र चालत आहोत – खोऱ्यांतून आणि जंगलांतून, वाळवंटातून आणि पर्वतरांगांमधून, खेडेगावांतून आणि झोपडपट्टींतून – बुलडोझरांना आव्हान देत, जमिनींची रक्षा करत, बेड्यांना तोडत आणि अन्यायाच्या भिंती पाडत! जात, धर्म, लिंगाच्या नावावर आम्हाला वेगळे करणाऱ्यांचा मुकाबला करत, विद्वेषाला प्रेम आणि करुणेने उत्तर देत!

आमच्या संघर्षांची आठवण काढत, आक्रोश करत आज आम्ही हैदराबाद मध्ये एकत्रित झालो आहोत आणि परत संकल्प करत आहोत. आम्ही जन आंदोलनांची शक्ती आहोत, आम्ही थांबणार नाही! संविधानाने दाखवलेल्या मार्गावर आम्ही निश्चयाने आणि साहसाने पुढे चालत आहोत.

आमच्या काळाची हकिकत

आजचा काळ हा सामान्य काळ नाहीये. आज आपण अशा काळात जगत आहोत जिथे जळ, जंगल, जमीन, समुद्र आणि श्रमांना कॉर्पोरेशन च्या हवाली केलं जात आहे आणि शेतकरी, मच्छीमार, कष्टकरी आणि शहरी गरीब कर्ज, भूक आणि विनाशाच्या अंधारात ढकलले जात आहेत. नदीवरील धरणे गावांना खाऊन टाकत आहेत, खाणी धरतीला चीरत आहेत, कारखाने हवेला विषारी बनवत आहेत आणि औद्योगिक कॉरिडोर विस्थापितांच्या थडग्यांसारखे उभे केले जात आहेत – प्रत्येक परियोजना ही नफ्यासाठी तयार केली जात आहे, गरिबांच्या, कष्टकऱ्यांच्या आणि सामान्य जनतेच्या प्रेतांवर!

नव–उदारमतवाद आणि हिंदुत्व एक साथ चालत आहेत. एक लुटत आहे आणि दुसरा मारत आहे. आमचे लोकशाहीवादी श्वास घोटत आहेत. आज भाजप आणि त्यांचे सहकारी स्वत:ला 'आधुनिक' म्हणत आहेत पण पूर्वीच्या राजांच्या, भांडवलदारांच्या आणि वसाहतवाद्यांच्या हुकुमशाही पद्धतीप्रमाणेच त्यांची प्रवृत्ती आणि शूरता आहे. इतिहासाला मोडून तोडून दाखवत आहेत, संस्थांना नष्ट करत आहेत आणि मतभेद आणि टीकेला पायाखाली तुडवत आहेत, घटनेत बदल करत आहेत, निवडून आलेल्या सरकारांना पाडत आहेत, जन प्रतिनिधींची खरेदी विक्री करत आहेत, जनता विरोधी कायदे आणत आहेत आणि अनैतिक राजकारणाला मुख्य प्रवाहात स्थापित करत आहेत. आणि दुसरीकडे बाजार आणि त्याचे अदानी अंबानी सारखे क्रोनी भांडवलदार आपल्या संपत्तीचा असभ्य उत्सव मांडत आहेत.

आज जेव्हा विषमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे तेव्हा त्यांची संपत्ती करोडो पटीने वाढली आहे. शिक्षणाचा व्यापार झाला आहे. विश्वविद्यालयांना कब्जात घेऊन त्याला हिंदुत्वाची प्रयोगशाळा बनवले जात आहे; तिथे कुठलाही विरोध झाल्यास तो हाणून पाडला जातो. जसं जसं ज्ञान आणि बुद्धिमत्ता बंदीवान होत आहेत तस तसं अज्ञान एक हत्यार बनत चाललं आहे. हिंदुत्वाची पकड घट्ट होते आहे शेजाऱ्याला शत्रू बनवलं जातंय, प्रेमाचं रूपांतर घृणेत होत आहे, नागरिकतेला मुस्लिम आणि इतर अल्पसंख्यांकांना निशाण्यावर घेण्याचे अस्त्र बनवलं जात आहे. दलित, आदिवासी, बहुजन, मुस्लिम, महिला, LGBTQ समुदाय जातीच्या, पुरुषप्रधान आणि धार्मिक वर्चस्वाच्या चक्कीत भरडले जात आहेत; आणि या अन्यायाला 'विकास' आणि 'छद्मी राष्ट्रवाद'च्या पडद्याखाली झाकले जात आहे. राज्य

दडपशाही च्या छायेच्या आड काम करत आहे कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकलं जात आहे, पत्रकारांना गप्प केलं जात आहे, कलाकारांचे आवाज सेन्सॉर होत आहेत आणि जन आंदोलनांना ‘दहशतवादी’, ‘राष्ट्र विरोधी’ आणि ‘अर्बन नक्षल’ बोललं जात आहे. दुष्प्रचार आणि खोट्याचा बाजार आज प्रत्येक टीव्ही स्क्रीन वर पसरला जातो आहे, सोशल मिडियाला द्वेष आणि हिंसेचं हत्यार म्हणून वापरलं जातंय आणि खोट्या प्रचाराला वास्तव सांगितलं व बनवलं जातंय. सामान्य जनता एखादया वेड्या जमावा प्रमाणे मनुवादी आणि फॅसिस्ट विचारांच्या गर्तेत बुडत चालली आहे आणि फॅसिझम चा रथ देशात आणि जगातही वेगाने पुढे जातो आहे. आणि असे सगळे असूनही आपल्याला ‘अच्छे दिन’चं खोटं स्वप्न विकलं जात आहे. आम्ही त्यांना सांगू इच्छितो की, नाही, हे युध्द आणि हुकुमशाही आहे!

जागतिक स्तरावरही आपण एका तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहोत; गाझा, युक्रेन, कांगो, सुदान आणि अजूनही काही देशात युद्ध आणि संघर्ष भडकले आहेत. आणखी काही देशात वाढत असलेली उजव्या विचारांची शक्ती विश्व शांतीसाठी धोकादायक आहे, जिथे सत्ताधारी शक्ती हुकुमशाही, वसाहतवादी विस्तार आणि वर्चस्ववादी स्वरुपाची सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न करत आहेत. विरोध करणाऱ्यांवर पाळत ठेवण्याच्या पद्धतीत लोकशाही चिरडली जाते आहे, मतभेदाला डिजिटली दडपलं जात आहे आणि निवडणुका भांडवलशाहीच्या बाजारात विकणाऱ्या तमाशा सारख्या वाटू लागल्या आहेत. लुटणाऱ्या विनाशकारी भांडवलदारांबरोबर मिळून या सत्ताधारी शक्ती युद्धातून आणि नैसर्गिक आपत्तींतूनही नफा कमवत आहेत, जागतिक विषमतेला अजूनच तीव्र करत आहेत आणि हवामान बदलाच्या संकटात व्यापाराच्या संधी शोधत आहेत ज्यामुळे विध्वंसातूनही नफा कमावता येईल. आपलं दुर्भाग्य आहे की हवामान बदलाच्या संकटावर आता आपत्कालिन पावलं उचलायला हवीत असं आवाहन न करता उलट त्याला नफेखोरीचे एक नवे माध्यम बनवलं जात आहे. नदींना धरणांनी जखडून टाकले आहे, जंगलांचा लिलाव चालवला आहे. पर्वतांना फोडलं आणि खोदलं जातंय, एवढंच नाही तर हरित ऊर्जेला, अक्षय ऊर्जेला सुद्धा भांडवलदारांच्या दावणीला बांधलं जातंय. हे केवळ मानवजातीच्या विरुध्द नव्हे तर सर्व जीव जंतूंविरुद्ध एक युध्द छेडलं जात आहे. संपूर्ण इकोसिस्टमला तोडलं जातंय. अनेक पाणी आणि वनस्पतींच्या प्रजाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत आणि पृथ्वीला एक उपभोगी वस्तूसारखे निर्जीव करून ठेवले जात आहे.

निसर्गाचं असं निर्दयी शोषण पिढीजात हवामान न्यायाच्या सिद्धांताचे उल्लंघन आहे यामुळे अशा लोकांच्या भविष्याची लूट चालली आहे जे अजून जन्मलेही नाहीत. त्यांच्यासाठी विनाश आणि अभाव पूर्ण जग मागे ठेवलं जात आहे. लोकांना सांगितलं जातंय की तुम्ही ‘स्वतंत्र’ आहात पण त्यांचे आवाज मात्र खोट्या प्रचाराच्या समुद्रात बुडवले जात आहेत. न्यायाचे आंदोलन आता केवळ मानवता पर्यंत सीमित नाही तर हा संपूर्ण निसर्गाच्या संरक्षणाची लढाई आहे. एका अशा जगाला पुन:प्राप्त करण्याचा संघर्ष जिथे पाणी, जमीन आणि हवा कुणाची खाजगी संपत्ती नाही तर सर्व सजीवांचा सामाईक वारसा असेल.

आजचा काळ खूपच काळोखा आणि निराशेने भरलेला वाटतो आहे पण त्यातही प्रतिकाराच्या लाटा उठत आहेत नदीपासून समुद्रा पर्यंत, शहरांपासून गावापर्यंत! आम्ही त्यांना सांगू इच्छितो की, आम्ही घाबरत नाही! आम्ही वाकत नाही! आम्ही भीक नाही मागत! आम्ही विनाश, विस्थापन, असमानता आणि मानवाधिकार यांच्या उल्लंघनाच्या विरोधात लढत राहू! आम्ही जन चळवळ आहोत. आम्ही भविष्याच्या संरक्षणासाठी उभे आहोत अखंडता, प्रतिष्ठा आणि न्यायाच्या साथीने.

आमचा संकल्प आणि संघर्ष

तीस वर्षांपूर्वी जेव्हा नव उदारमतवाद आणि जातीयवाद यांची दाहकता आपल्या देशाला गिळू पहात होती तेव्हा आम्ही NAPM च्या मंचावर एकजूट झालो होतो. नर्मदा पासून नंदीग्राम, कलिंगनगर पासून कुडनकुलम, प्लाचीमडा पासून दाभोळ, भोपाळ पासून पॉस्को पर्यंत आम्ही लढाई लढलो. ही लढाई आम्ही एकट्याने नाही लढली. एका युतीच्या माध्यमातून लढली, एका आंदोलनाच्या रूपाने कित्येक समविचारी संघटना आणि आंदोलनांच्या साथीने! न्यायाचे हे स्वप्न अर्धे अधूरे स्वप्न नव्हते जे जमिनीत पुरले जाऊ शकते, ती तर अस्तित्वाची लढाई होती – विशाल आणि खोल, कठीण पण अटळ!

आम्ही आज घोषणा करतो की: संघर्ष चालूच राहील, पर्यायांच्या निर्माणाबरोबर !

आमच्या घोषणेच्या बरोबरीने, संघर्ष निर्माण – साथ साथ ! ही केवळ अस्तित्वाची लढाई नाही, एक अशा भविष्या साठी संघर्ष आहे जिथे शेतकरी आपल्या जमिनीचा मालक असो आणि कष्टकरी आपल्या औजारांचा, नद्या मुक्त वाहोत, जंगल सुरक्षित राहो, पहाड अस्पर्श राहोत आणि ग्लेशियर संरक्षित असोत . एक असं भविष्य जिथे 'विकास'चा अर्थ विनाश आणि छळ नाही तर सन्मान, शांती आणि न्याय असो. जिथे शाळेतून स्वातंत्र्य शिकवलं जाईल, भीती नाही; घर आणि समाज प्रेमाच्या पायावर उभे राहोत, घृणेच्या नाही; रस्त्यांवर लोकांचा हक्क असो, पोलिसांचा नाही; लोकशाही जनतेची असो, भांडवलदारांची नाही; हवामान बदलावर उपाय न्याय असो, नफेखोरी नाही; जिथे धोरणे पुढच्या पिढीचा विचार करुन बनवली जातील, आजच्या फायद्याच्या मोहाने नाहीत; जिथे निसर्ग भांडवलाच्या चरणावर बळी ना जावो, उलट सर्व जीवमात्रांचा सामायिक वारसा मनाला जावो.

आमची प्रतिज्ञा: प्रतिकार, पुनर्निर्माण आणि अहिंसक क्रांती

आम्ही प्रतिज्ञा घेतो की आम्ही जल, जंगल, श्रम आणि संसाधनांच्या लुटीचा विरोध करू; इतिहासाचे परिवर्तन, कायदे आणि नागरिकतेला विकृत करण्याच्या कारस्थानला आम्ही विरोध करू, शिक्षण, आरोग्य आणि निवास च्या बाजारीकरणाला विरोध करू, श्रमिकांचे अधिकार, आदिवासींची स्वायत्तता आणि लैंगिक न्याय नामशेष होण्याला विरोध करू, ठोस आरोपाशिवाय कैदेत असलेल्या आमच्या साथींच्या आणि नागरिक स्वातंत्र्याच्या दमनाला विरोध करू, सोशल मिडिया च्या हत्यारीकरणाचा आणि लोकशाही मूल्यांच्या होत असलेल्या ऱ्हासाला आव्हान देऊन संघर्ष करू.

आम्ही संकल्प करतो की आम्ही अशा जन – आधारित अर्थव्यवस्था आणि समाजाचं पुनर्निर्माण करू जे समुदायांच्या सहकार्यावर आणि परिस्थितीच्या संतुलनावर आधारित असेल; एक अशी राजनीती आम्ही स्वीकारू जिथे सत्ता धन कुबेरांच्या आणि नेत्याच्या नाही तर ग्रामसभेच्या आणि जन – संसदांच्या हातात असेल. एक अशी व्यवस्था आणू जिथे दलित, आदिवासी, महिला, श्रमिक आणि अल्पसंख्यांक केवळ जगतील असं नसून समानतेने राहून समृद्ध होतील !

आम्ही या आंदोलनाला अजून मजबूत करू आणि संघर्षाच्या रस्त्यावर एकत्र मिळून पुढे जाऊ !

जय संविधान ! जय भीम ! जय जन आंदोलन !

अनुवाद: मीनल उत्तुरकर

meenalutturkar16@gmail.com

NAPM चे विविध विषयांवरील विशेष राष्ट्रीय मंच

१) राष्ट्रीय किसानी व कृषक समुदाय मंच (National Alliance of Agrarian Communities)
२) राष्ट्रीय श्रमिक अधिकार मंच (All India Workers Forum)
३) राष्ट्रीय शहरी आंदोलनकारी मंच (SHRAM – National Urban Struggles Forum)
४) अखिल भारतीय नदी घाटी मंच (National River Valleys Forum)
५) राष्ट्रीय जलवायू आणि पर्यावरणीय न्याय मंच (National Alliance for Climate & Ecological Justice - NACEJ)
६) न्याय, जबाबदेही आणि हक्क यासाठीचा मंच (National Alliance for Justice, Accountability and Rights - NAJAR)
७) अखिल भारतीय नारीवादी मंच (All India Feminist Alliance - ALIFA)
८) अखिल भारतीय इंकिलाबी युवा आणि विद्यार्थी मंच (All India Inquilabi Youth and Students Alliance - ALIYSA)
९) राष्ट्रीय स्वास्थ्य अधिकार मंच (National Health Rights Forum)

हैदराबाद संमेलनात २ समांतर सत्रात, एकावेळी ७ - ७ अशा १४ विषयांवर गटचर्चा झाल्या. त्यात वरील ९ विषय होते आणि त्या व्यतिरिक्त पुढील ५ विषयांवर चर्चा झाल्या:

१०) सांप्रदायिक वैरभाव, हिंसा आणि समाजातील सामाजिक सौहार्द
११) नागरिकता, अलगाववाद आणि विविध जन अधिकारांवरील हल्ले
१२) दलित, आदिवासी, भटके – विमुक्त आदी परिघावरील जन समुदायांचे लढे
१३) माहितीचा अधिकार, data संरक्षण आणि जबाबदेही
१४) पॅलेस्टाईन मधील संघर्ष

एखाद दोन गट वगळता, प्रत्येक गटात ८० ते १०० प्रतिनिधी सहभागी झाले होते. या चर्चांमधून पुढे आलेले अनेक प्रस्ताव संमेलनाच्या खुल्या सत्रात पारीत करण्यात आले असून ते स्वतंत्रपणे अंकात दिलेले आहेत.

संमेलन खास वृत्तांत विशेष अंकाच्या विशेष प्रतिनिधींना झिंदाबाद!

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (National Alliance of People9s Movement – NAPM) या गेली ३० वर्षे सुरू असलेल्या राष्ट्रीय समन्वय मंचाचे राष्ट्रीय संमेलन, १ ते ४ मार्च या काळात हैदराबाद येथे संपन्न झाले. देशभरातील २३ राज्यातून सुमारे ८०० प्रतिनिधी या अधिवेशनात सहभागी झाले होते. महाराष्ट्राच्या विविध भागातून सव्वाशेहून अधिक सहकारी उपस्थित होते. या संमेलनाच्या सर्व सत्रांचे अचूक छायाचित्रीकरणाचे काम, समन्वयाच्या महाराष्ट्र समन्वयक टीमचा सदस्य पालघरच्या **सुजय मोरे** (sujay.more04@gmail.com) यांनी अखंडपणे केले. इचलकरंजीच्या संविधान संवादक आणि आरोग्य संवादक राष्ट्र सेवा दलाच्या **वैभवी आढाव** (vaibhaviadhav149@gmail.com) यांनी आंदोलन मासिकाच्या संपादक मंडळ सदस्य **मीनल उत्तुरकर** (meenalutturkar16@gmail.com) यांच्यासह चार दिवसातील सर्व सत्रांची टिपणे काढली. वैभवीने चिकाटीने काढलेली टिपणे आणि नंतर बनवलेला अचूक व नेमका वृत्तांत, यासाठी वैभवीचे विशेष कौतुक!

हैदराबादहून परतल्यावर लागलीच ही सर्व मंडळी सर्व विडियो यू ट्यूब वर टाकणे, आपली टिपणे व ते विडियो याच्या आधारे आंदोलन मासिकाच्या या अंकासाठी संपूर्ण संमेलनाचा खास वृत्तांत बनवायला घेणे या कामाला लागले. आंदोलन मासिकाच्या वरिष्ठ सहकारी **डॉ. सुहास कोल्हेकर** (kolhekar.suhas@gmail.com) यांनी संमेलनात पारित झालेले सर्व ठराव विषया वार एकत्र करून त्याचा वृत्तांत तयार केला. काही अपरिहार्य कारणांमुळे ऐनवेळी हैदराबाद संमेलनाचे तिकीट रद्द करावे लागलेल्या महाराष्ट्र समन्वयक टीमच्या वरिष्ठ सदस्य आणि आंदोलन मासिकाच्या नियमित लेखिका व अनुवादक **सिरत सातपुते** (satputesirat@gmail.com) यांनी विडियो वरुन संमेलनातील काही सत्रांचे खास वृत्तांत तयार केले. लक्षात असू द्या की संमेलनातील भाषणे हिंदी किंवा इंग्रजीतून झालेली होती. त्यामुळे वृत्तांत बनवतांना अनुवादाचे काम सर्वांनाच करावे लागले. संमेलनात घेतलेला संकल्प अर्थात Hyderabad Declaration चा मराठी अनुवाद **मीनल उत्तुरकर** यांनी केला.

सुमारे ३ आठवडे सतत धावपळ करून, आंदोलनच्या या सिद्धहस्त टीमने हा **हैदराबाद संमेलन विशेष अंक** तयार केला आहे. त्यांच्या मेहेनतीमुळेच संमेलनातील कारवाईचा संक्षिप्त दस्तऐवज (documentation) तयार होवू शकला. आंदोलनचे जे वाचक काही कारणांमुळे संमेलनास येवू शकले नाही, त्यांना घरबसल्या सर्व वृत्तांत मिळू शकला. आंदोलनच्या या सर्व टीमला आणि त्यांना मदत, सहकार्य व प्रोत्साहन देणाऱ्या सर्व सहकार्यांना मन:पूर्वक झिंदाबाद!

अंक वाचून झाल्यावर, आपला प्रतिसाद आंदोलनला andolan.magazine@gmail.com वर आणि त्या त्या लेखकास त्यांच्या मेलवर अवश्य कळवा. **ज्यांना संमेलनातील विविध सत्रांच्या यू ट्यूब लिंक्स हव्या असतील, त्यांनी सुजय मोरे यांना ईमेल करून त्या मागवून घ्याव्या.**

- कार्यकारी संपादक

आंदोलन मासिक :युवा टीम जिंदाबाद!

- पालघरच्या **सागर सुतार**चा लेख आवर्जून वाचा. सागरच्या पाठीशी खंबीर **सुजय मोरे** जिंदाबाद!
- संमेलनाच्या सभागृहात ठाण मांडून वृत्तांत टिपून घरी परतताच त्याचा मराठी वृत्तांत बनवणे, सुजयच्या यू ट्यूब वरून तो पुन्हा verify करून घेणे व वेळेत तो पाठवणे यासाठी **वैभवी आढाव**चं विशेष कौतुक. Keep it up Vaibhavi!
- वैभवी व तिच्यासारख्या अनेक युवा सहकाऱ्यांना सतत प्रोत्साहन व आंदोलन जाहिरातदार, वर्गणीदार वाढवण्यात पुढाकार घेणारा **संजय रेंदाळकर** जिंदाबाद!
- गेली अनेक वर्षे अंकाचं विचार प्रवर्तक व देखणं मुखपृष्ठ तयार करणारा नाशिकचा **प्रतिक ठाकूर** (pratik.arunthakur@gmail.com) जिंदाबाद!
- दरमहा लेखांच्या फाईल्स आल्यावर सर्व मजकूर ३६ पानात छान बसवून अंक वेळेवर छपाईसाठी पाठवणारा ठाण्यातला **पंकज गुरव** (pankajgurav@live.com) जिंदाबाद!

- कार्यकारी संपादक

युवा मन

NAPM हैद्राबाद अधिवेशन आणि बरंच काही

सागर सुतार

निसर्गातील प्रत्येक सजीव व निर्जीव घटकांच्या संरक्षणासाठी, संविधानाने व निसर्गाने बहाल केलेल्या हक्क, अधिकार आणि न्यायासाठी, भांडवलशाह व भांडवलशाही वृत्तीला सहकार्य करणाऱ्या राजकीय व्यवस्थेला विरोध करण्यासाठी, परिणामांची भीती न बाळगता संविधानिक शस्त्रासह लढत राहण्याची प्रतिज्ञा घेतलेल्या काही ध्येय्यवेड्या लढाऊ कार्यकर्त्यांचा समूह म्हणजे एन ए पी एम. (National Alliance of People's Movements) – जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय.

भारतभरातून आपापले प्रश्न घेऊन ही सर्व मंडळी हैदराबाद येथे एकत्र जमली होती. अगदी काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत, पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत निरनिराळ्या भाषांची, पेहरावांची, काळी– गोरी, उंच– ठेंगणी, शहरी– ग्रामीण, सुशिक्षित–अशिक्षित मंडळी जन आंदोलनांचा एक कार्यकर्ता म्हणून एका छताखाली जमली होती. जन आंदोलनातले अनुभव एकमेकांशी साझा करण्यासाठी, विचारांची देवाण–घेवाण करण्यासाठी, आपला आंदोलनात्मक प्रश्न सोडवण्याचं औषध शोधण्यासाठी, ही सगळी मंडळी एकमेकांशी हितगुज करीत होती.

ही माणसं तुमच्या आमच्या सारखीच आहेत. फक्त आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची यांना जाणीव आहे. त्यांनी आपला विवेक जागृत ठेवला आहे. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात मोठ्या धैर्याने ते प्रतिकार करण्यासाठी सज्ज होतात. त्यांचा हा लढा अभ्यासात्मक असतो. व्यवस्थेच्या प्रत्येक टप्प्यावर ते घटनात्मक नोंदींचा उल्लेख करत असतात. ही तीच राज्यघटना आहे जिला वाचण्याचा सामान्य माणूस सहसा कंटाळाच करतो. हा लढा, हा त्यांच्या स्वत:साठीचा बिलकुलच नाही. हा लढा त्या प्रत्येकासाठी आहे ज्यांना निसर्गाने बहाल केलेल्या बाबी निरोगी, विनामूल्य व स्वाभिमान पूर्वक मिळत नाहीत. हा लढा संविधानाचा एकाधिकार अबाधित राहण्यासाठीचा आहे. आणि असे जर असेल तर हा लढा प्रत्येकाने लढणे आवश्यक आहे. पण तसं होताना दिसत नाही. बहुतांशी लोक आंदोलने, चळवळी यापासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतात. येथेच इतरांतील व अन्यायाच्या विरोधात लढणाऱ्या ह्या एनएपीएमच्या कार्यकर्त्यांमधील वेगळेपण समोर येतं.

एकाच मंचावरून व्यक्त होणारी ही मंडळी, कोणत्याही एकाच वयोगटातली नाहीत. १९ – २० वर्षांची मुलगी भाषण करण्यासाठी व्यासपीठावर येते. जय भीम, जोहार, सतरंगी सलाम यासारख्या शब्दाने भाषणाची सुरुवात करते. युवांच्या प्रश्नांवर आंदोलने करण्याची भाषा करते. तेव्हा माझ्यासारखा ऐकणारा अवाक झाल्याशिवाय राहत नाही. हुबळी वरून आलेला महारथी मधु किरण नावाचा जेमतेम २५ वर्षे वयाचा काळा सावळा तरुण दाढी वाढलेली. केसही तसेच. पण आवाज पराकोटीचा तीक्ष्ण. तो १३० असंघटित सफाई कामगारांना सेवेत कायम करण्यासाठीचा लढा उभारतो आणि तो लढा यशस्वी करून दाखवतो. तेव्हा त्याच्यातल्या असाधारणत्वाच नाणं खणखणीतपणे वाजतं.

ज्या वयात प्रेमाच्या कविता लिहिण्याला उत येतो, अशा वयात झाडांचं महत्त्व पटवून देणारी व ती जगवण्यासाठी कसा प्रयत्न करेन या विषयाची एक सुंदर कविता युनिव्हर्सिटी मध्ये शिकणारा तरुण विद्यार्थी व्यासपीठावरून गाऊन दाखवतो. तेव्हा प्रेम करण्याच्या इतर अनेक जागा (जिथे नाही ज्यावर प्रेम करू शकतो अशा) युवा तयार करतो आहे, यावर विश्वास बसतो. केवळ क्रिकेट, मोबाईल आणि तत्सम गोष्टीत अडकलेला माझ्या आसपासचा युवा क्रिकेट खेळता यावं म्हणून राजकारणी व ठेकेदार डोंगर फोडून मैदान करून देणार आहेत, या प्रलोभनाला बळी पडतो. आणि पृथ्वीच्या उत्पत्ती पासून सोबत करीत आलेल्या डोंगरांच्या छातीवर चालणारा जेसीबीचा फावडा तो शांत नजरेने पहात बसतो. तेव्हा वर उल्लेख केलेल्या एनएपीएम च्या युवांचा आदर्श यांना घेता येणार नाही का? असाही विचार मनात येतो. व्यासपीठावरून या युवा पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या भाषणाचा समारोप

करताना तारुण्याची धगधगती मशाल लोक कल्याणाकरताही वापरता येऊ शकते अशा आशियाची घोषणा दिली - "कुछ तो करो जवानी में, आग लगा दो पानी में!"

वय अंदाजे ८० – ८५ वर्ष. तामिळनाडू वरून आलेली एक आजीबाई. उंचीने ठेंगणी, केस पांढरे शुभ्र झालेले, तोंडातले बहुतेक दात पडलेले, हिंदी इंग्रजीचा गंध नाही, पेशाने बहुदा मच्छिमार. त्या वातावरण बदलाचे मासेमारीवर होणारे दुष्परिणाम समजावून सांगत होत्या. केवळ दुष्परिणामांचा पाढा वाचून त्या थांबल्या नाहीत. तर त्यावर काय उपाययोजना करणे गरजेचे आहे या विषयावर जवळजवळ अर्धा तास त्या व्यासपीठावरून बोलत होत्या. मला आणि बहुदा अनेकांना त्यांची भाषा जरी कळली नसली तरी विषयाचे गांभीर्य समजत होते.

अरावली पर्वत रांग उष्ण हवेपासून भारताचे संरक्षण करते. हे आपण बहुदा सगळेच भूगोलात शिकलेलो आहोत. याच अति प्राचीन अशा अरावली पर्वतांच्या घड्यांमध्ये लोह, सोन, तांब असल्या प्रकारचे खनिज सापडू शकतात, असा शोध लागतो. तेव्हा अरावली पर्वताच्या भौगोलिक महत्त्वावर पाणी फिरवून, सत्ताधीश मोठ मोठाल्या खाणींचे परवाने वाटप करत सुटतात आणि हिमालयाच्याही उत्पत्तीपूर्वीची पर्वतरांग राक्षसी भुकेने ओरबडून नष्ट केली जाते. ६९३ किमी लांबीची ही अरावली पर्वतरांग आजच्या घडीला २० टक्क्याने नष्ट झाल्याचे स्थानिक रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते कैलाश मीणा आणि नीलम अहलुवालिया सांगतात. या उत्खननामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाले आहेत. लहान मुलांमध्ये दम्याचा त्रास वाढतो आहे. पाण्याचे स्त्रोत कमी होऊ लागले आहेत. स्थानिकांनी अरावली नष्ट होऊ नये म्हणून शर्थीचे प्रयत्न सुरू केले आहेत. अशा या जनआंदोलनाच्या मंचावरून, ही अशी धाडसी मंडळी बोलू लागली. ती त्यांच्या कहाण्या स्वत: सांगू लागली की, ऐकणाऱ्यातही एक अनामिक ऊर्जा निर्माण होते आणि मन बंड करून उठत. अन्यायाविरोधात प्रतिकार करू पाहतं आणि अजून काय नवीन ऐकायला मिळेल या प्रतीक्षेत नजर पोडिअमच्या दिशेने टक लावून राहते.

टी एम कृष्णा हे पेशाने संगीतकार, कलेचा उपासक. त्यांची व्यथा त्यांनी आणखी निराळ्या पद्धतीने मांडली. कलेचा वापर समाजात तेढ निर्माण करण्यासाठी कसा केला जात आहे. हे सांगताना त्यांनी सिनेमा, गाणी यांचे अनेक दाखले दिले. भारतीयांच्या जीवनाचा एक मोठा भाग सिनेमांशी बांधला गेलेला आहे. हे जाणून घेऊन काही समाजकंटक त्यांचा जोरदार मारा लोकांवर करत आहेत. या असल्या दृकश्राव्य प्रदर्शनामुळे व्यक्ती व्यक्तीत, धर्मा धर्मात तेढ निर्माण करण्याचा कसा प्रयत्न केला जात आहे हे ते सांगत होते. अशा वृत्तीना शह द्यायचा असेल तर, त्याचे उत्तर देखील याच माध्यमातून देणे गरजेचे आहे. "One Nation one culture" या संदर्भात बोलताना कृष्णा म्हणतात, भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भारतात राज्यागणिक विभिन्नता, वैविध्यता पाहायला मिळते. असं असताना वन नेशन वन कल्चर असे म्हणणे योग्य ठरणार नाही.

'जिंदगी जिंदाबाद' अशी घोषणा देऊन बेला भाटिया या केंब्रिज युनिव्हर्सिटीतून शिक्षण पूर्ण करून आलेल्या एक महिला कार्यकर्त्यांनी भाषणाला सुरुवात केली. (एवढ्या नावाजलेल्या शिक्षण संस्थेतून शिक्षण पूर्ण झाल्यावर त्या भारतात येतात आणि लोकसेवा करण्याचा निर्णय बोलून दाखवतात. तेव्हा चार दोन पुस्तकं वाचलेली काही मंडळी त्यांना वेडं ठरवतात. पण मला तर मुळात त्यांच्या ह्या असल्या धाडसी निर्णयाला सलाम करावासा वाटतो. बस्तर सारख्या ठिकाणी जिथे स्थानिक प्रशासन व माओवादी यांच्या कात्रीत अडकलेली माणसे किड्या मुंग्यांसारखी मारली जातात, अशा ठिकाणी एका महिलेने काम करण्याची तयारी दर्शवणे हे वेड अंगीकारायला मनाची एकाग्रता लागते. मन आणि मेंदूत एकमत घडवून आणणं हे येड्यागबाळ्याचे काम नव्हे!) बस्तर मधले त्यांचे अनुभव त्या कथन करीत होत्या. आणि इतरांप्रमाणे मीही आतून बाहेरून हादरून गेलो होतो. जंगल सोडून विस्थापित होण्यासाठी प्रशासनाकडून स्थानिक आदिवासींवर दबाव टाकला जात आहे. कारण त्या जंगलाची जमीन ज्या जंगलाच्या आधाराने ते आजपर्यंत राहत आले आहेत. ती जमीन ज्याला देव मानून त्याची पूजा करत होते. त्या जमिनीच्या पोटात कोळसा आहे असे सांगून कोळसा खाणीला जागा देण्यासाठी. कोणा एकाची कमाई वाढवण्यासाठी, लाखो आदिवासींना जंगलातून हाकलले जात आहे. असे न केल्यास गोळ्या घातल्या जात आहेत. या गोळ्या लागून मरणाऱ्यांमध्ये फक्त मोठी माणसं

नाहीत, तर अंगणात खेळणारी लहान मुलं देखील आहेत. तेथील महिलांवर होणारे अत्याचार ही एक कॉमन गोष्ट झालेली आहे असे त्या म्हणतात. तेंदुपत्ता आणायला म्हणून रानात गेलेला घर मालक घरी परतून आलाच नाही. त्याची शहानिशा करण्यासाठी बायको पोलीस स्टेशनला जाते. ही पोलीस स्टेशनची वाट २५ किलोमीटर लांबीची घनदाट जंगलाची आहे. हे संपूर्ण रान तुडवत, रडत, पडत ती पोलीस स्टेशनला पोहोचते. तेव्हा तिथे तिला दिसतं की, इतर गावातली देखील अनेक मंडळी तेथे जमलेली आहेत. कुणी रडतंय, कुणी ओरडतंय, कुणी चक्कर येऊन पडलय. एवढा लांबचा पल्ला चालून थकलेली ती महिला किंचाळत रडत अधिकाऱ्याला विचारते की, माझा घरमालक मेलेल्यात आहे की जिवंतात, ते मला सांगा. कारण पोलीस स्टेशनच्या बाहेर प्रेत प्रदर्शनासाठी मांडावी तशी मांडून ठेवलेली आहेत. चीड आणणारी अशी अनेक उदाहरणं त्या सांगतात आणि मन सुन्न होऊन जातं. हे इतकं सहन केल्यावर कुणी म्हणेल घ्या ही जमीन आणि टाका करून हिरव्यागार जंगलाच मातेरे आणि लाथ मारून तो तिथून निघून गेला असता. पण तसा साधा विचारही ह्या आदिवासींच्या मनात येत नाही. आपल्या जगण्याची किंमत देऊनही स्थानिक मंडळी जंगल वाचवण्यासाठी लढा देत आहेत. कारण लढाई अस्तित्वाची आहे. बेलाजींनी सुरुवातीला जिंदगी जिंदाबाद का म्हटलं हे मला समजलं होतं.

जी परिस्थिती बस्तरची तीच हसदेवच्या जंगलाची आहे. लाखो झाडं एका कोळसा खाणीसाठी तोडली गेली आहेत. लाखो झाडं कापली जाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. जोवर सरकारी फाईलचं तोंड बंद आहे तोवर त्यांनी आनंद मानावा अशी परिस्थिती. 'एक पेड मा के नाम' म्हणत छत्तीसगड सरकारने हजारो हेक्टर जमिनीवरील झाडे कापली. पेसा ग्रामपंचायतीचे अधिकार नाकारले जात आहेत. तरीही उर्वरित जंगल वाचावं यासाठी स्थानिक आदिवासी लढा देत आहेत.

जम्मू – काश्मीरचे शेख गुलाम रशीद म्हणतात की, ३ % पर्यटनाच्या नावाखाली ९७ % शेती व्यवसायावर गाढवाचा नांगर फिरवला जात आहे. कलम ३७० हटवल्याने अनेक धनिक परप्रांतीयांनी हॉटेल रेस्टॉरंट च्या नावाखाली जागा विकत घ्यायला सुरुवात केली आहे. वातावरणीय बदलांमुळे येथे गर्मी वाढत आहे. आणि या वाढलेल्या तापमानामुळे येथील शेत पिकांवर त्याचा गंभीर परिणाम दिसून येत आहे. रशीद शेवटी म्हणतात, "ये खामोश अदाये तुम्हे जीने नही देंगी, जीना है तो कोहराम मचा दो!"

सिल्वर लाईन या नावाने ५३० किलोमीटर लांबीचा एक आणखीन बुलेट ट्रेन प्रकल्प केरळमध्ये राबवण्यात येणार आहे. कासारगोडा ते तिरुअनंतपुरम च्या दरम्यान हा प्रकल्प तयार केला जाणार आहे. इथेही पुन्हा ५० हजार रहिवाशांचे विस्थापन होणार आहे. माशांच्या जवळपास ४७ प्रजाती या प्रकल्पामुळे प्रभावित होतील पैकी ३७ नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जवळपास २६१ भरती ओहोटीच्या क्षेत्रातून हा मार्ग जाणार असल्यामुळे, अनेक नद्यांना ओलांडून जाणार आहे, त्यामुळे पुराचा धोका संभवतो आहे. भूस्खलन, पूर, वातावरणीय बदल, धोक्यात येणाऱ्या माशांच्या प्रजाती अशा अनेक कारणाने सद्य परिस्थितीत हा प्रकल्प स्थानिकांनी थोपवून धरलेला आहे.

लेह लद्दाखच्या शांत प्रदेशाचा प्रश्न घेऊन जेव्हा सोनम वांगचुक बोलू लागतात तेव्हा समजतं की, विकास केवळ बस्तर, हसदेवच्या जंगलापुरता मर्यादित राहिलेला नाही. तो लेह लद्दाखच्या शांत, पांढऱ्याशुभ्र प्रदेशातही आपले हातपाय पसरतो आहे. फक्त त्या विकासाला eco friendly चा सुवर्ण मुलामा लावला जातो आणि लेह लद्दाखची ओळख असणाऱ्या मेंढपाळांना विस्थापित करण्याची तयारी केली जाते. तेव्हा जोरदार विरोधाअंती शासनाला हा प्रकल्प मागे घ्यावा लागतो. असल्या प्रकारचा एक अजून विजय राजस्थान मधील सिमेंट फॅक्टरीच्या विरोधात लढून मिळवल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. नुसती फॅक्टरी बंद करून शांत राहिले नाही तर त्या फॅक्टरीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर झालेल्या दुष्परिणामाच्या विरोधात हायकोर्टात याचिका दाखल केली गेली आणि नुकसान भरपाई देखील मिळवली गेली.

उत्तर प्रदेशच्या ऋचा ताई म्हणतात की, धर्माच्या नावावर तरुणांची डोकी भडकवण्याचं काम सुरू आहे. धर्माच्या नावाखाली वर्तमानातील लोककल्याणाच्या प्रश्नांना बगल दिली जात आहे. धार्मिक सलोखा बिघडत आहे.

विषय महाराष्ट्राचा येतो. लवासा सारख्या प्रकल्पाच्या

(पान २३ वर)

संमेलन उद्‌घाटन

लोकशाहीच्या संरक्षणासाठी संवैधानिक ते पर्यावरणीय न्यायाची लढाई आवश्यक!

वैभवी प्रेमलता संजय आढाव

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे (NAPM – National Alliance of People's Movements चे) मागील महिन्यात हैदराबाद येथे चार दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. NAPM च्या ३० वर्षांच्या वाटचालीचा सखोल मागोवा घेणाऱ्या या अधिवेशनात, पहिल्या दिवशी 'सांविधानिक न्यायापासून हवामान न्यायापर्यंत' या उदघाटनाच्या पहिल्या सत्रात देशात विविध ठिकाणी विविध समस्यांवर जन आंदोलनांच्या क्षेत्रात भरघोस कामगिरी करत एक मिसाल तयार करणारे अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते. त्या मान्यवरांनी त्यांचे अनुभव आणि विचार त्यांच्या मनोगतांतून वेधकपणे मांडले. त्याचा संक्षिप्त रिपोर्ट इथे देत आहोत.

हैदराबाद येथिल नामपल्ली भागात प्रदर्शन मैदाना (Exhibition Ground) च्या विस्तिर्ण प्रांगणाच्या प्रवेशद्वारापाशी असलेल्या महात्मा गांधीजींच्या पुतळ्यास वंदन करून, देशभरातून आलेल्या NAPM च्या शेकडो प्रतिनिधींनी मिरवणुकीने संमेलन स्थळाकडे कूच केली तेव्हा विविध भाषांमधील क्रांती गीते, ढोलकी व डफलीच्या तालावरची नृत्ये व घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. संमेलन मंडपाच्या बाजुच्या मैदानात तामिळनाडूच्या गॅब्रियल डायट्रीच, लेह लडाखचे सोनम वांगचूक, मुंबईचे इर्फान इंजिनियर, तेलगंणाच्या उमाशंकरी, केरळच्या कुसुमम जोसेफ, महाराष्ट्रातील जगदीश खैरालिया, मध्य प्रदेशातील डॉ. सुनिलम, उत्तर प्रदेशच्या रामबेटी, जम्मू काश्मिरचे डॉ. गुलाम रसूल शेख, मेधा पाटकर आदींच्या हस्ते NAPM च्या ध्वजाचे आरोहण झाले. सर्व उपस्थितांनी ध्वजासोबत मानवंदना दिली व मग सर्वजण अधिवेशनाच्या उदघाटनासाठी सभामंडपात पोहोचले. सुरुवातील विविध भाषातून रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.

अधिवेशनाच्या पहिल्याच सत्रात सर्वांचे स्वागत करत अधिवेशनाच्या आयोजक मीरा संघमित्रा आणि किरण विसा यांनी NAPM च्या स्थापनेबद्दल आणि गेल्या तीस वर्षातील वाटचालीबाबत थोडक्यात आढावा घेतला. १९९० च्या दशकात, भारतातील आर्थिक उदारीकरण आणि बाबरी मशीद पाडण्यासारख्या सांप्रदायिक हिंसाचारामुळे, जागतिकीकरण, सांप्रदायिकता आणि भेदभावाला विरोध करणारे गट १९९२ मध्ये NAPMची स्थापना करण्यासाठी एकत्र आले व अन्य पुरोगामी साथींच्या संयोजनाने NAPM बाबत संकल्पना उभी राहिली. संस्थापक सदस्यांपैकी एक नर्मदा बचाओ आंदोलनाच्या मेधा पाटकर होत्या. NAPM विविध विचारसरणींना एकत्र आणण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देते. शाश्वत विकास, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि शांततेच्या नव्या प्रतिमानावर आधारित विकास दृष्टिकोनांसाठी, NAPM आपल्या कार्यक्रमांमध्ये, कृतीत आणि संकल्पनांमध्ये महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, रामकृष्ण पेरियार आदींच्या क्रांतिकारी विचारांना आदर्श मानते. अहिंसेच्या मार्गाने संघर्ष आणि निर्माण बरोबरीने करण्याचा NAPM चा प्रथम पासून निर्धार आहे.

सर्व दिवंगत धुरीणांप्रती विनम्र अभिवादन

NAPM चे राष्ट्रीय समन्वयक केरळचे सी. आर. नीलकंदन, उत्तर प्रदेशातील अरुंधती धुरू आणि महाराष्ट्रातील डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी NAPM च्या कार्यात हिरीरीने भाग घेऊन सर्व कामावर आपला ठसा उमटवणाऱ्या दिवंगत कार्यकर्त्यांची आठवण काढत त्यांच्या स्मृतीला अभिवादन केले. त्यात बाबा आमटे, सिद्धराज डड्ढा, किशन पटनायक, भाई वैद्य, डॉ. बी. डी. शर्मा, समर बागची, मृणाल गोरे, स्वामी अग्नीवेश, फादर थॉमस कोचेरी, नूरजी पाडवी, नरेन्द्रनाथ, संजय संगवई, सुरेन्द्र मोहन, सुनील भाई, रामभाऊ पाटील, एन डी कोळी, डॉ. स्वाती, नागेश हाटकर, अनिता पगारे या समन्वय प्रक्रीयेतील प्रमुख सहकार्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यात आला. डॉ. नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, गौरी लंकेश, फादर स्टान स्वामी, सत्येंद्र दुबे आदी शहीद सहकार्यांप्रतीही यावेळी आदरांजली वहाण्यात आली.

NAPM @ ३० सफरनामाचे प्रकाशन

उदघाटनाचा परिसंवाद सुरु होण्याआधी समन्वयाच्या गेल्या ३० वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेणाऱ्या व भविष्यातील स्वप्नांचा उद्गार असणाऱ्या NAPM @ ३० सफरनामा या स्मरणिकेचं प्रकाशन करण्यात आलं. सुनीती सु. र., मधुरेश कुमार, आशीष रंजन, मीरा संघमित्रा व आदर्श शाही यांनी अत्यंत मेहनतीने संपादित केलेल्या, हिंदी - इंग्रजीत १९६ पानी मजकूर असलेल्या या विशेषांकात, दृष्टिकोन (Perspectives), NAPM या वाटचालीचा लेखा - जोखा (The Journey), विविध राज्यांचे वृत्तांत, आणि भविष्याचा वेध अर्थात विषयानुरुप NAPM च्या विविध मंचाची भूमिका (Positions and Proposals) अशा ४ भागात मिळून ३६ लेखांचा समावेश आहे. रमाकांत धनोकर, ज्यो अटियाली, तनुजा चौहान व तेलंगणातील NAPM टीमनें या अंकाच्या कला सजावट, निर्मिती व छपाईत मोलाचं सहकार्य केलं आहे.

जन आंदोलनेच देशाला वाचवू शकतील – जी. हरगोपाल

उद्घाटन सत्राचे अध्यक्ष होते हैदराबादमधील प्रसिद्ध विचारवंत आणि जन आंदोलनांचे सक्रीय समर्थक **प्रा. जी.** हरगोपाल. त्यांनी लोकशाही, पर्यावरण आणि संविधानिक न्याय यावर भाष्य केलं. सामाजिक चळवळी, कायदेशीर लढाया आणि पर्यावरणीय कार्य यामध्ये परस्परसंबंध कसा आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले, संविधान हे देशाच्या लोकशाही मूल्यांचे अधिष्ठान असून प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार प्रदान करते, तसेच सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाच्या तत्वांना बळकटी देते. पर्यावरणाचा व मानवी संबंधांचा असाच ऱ्हास सुरु राहणार असेल तर भविष्यासाठी काय शिल्लक राहणार, असा कळीचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. फॅसिझम संपूर्णत: नष्ट होण्यासाठी सर्व लोक चळवळी एकत्र यायला हव्यात आणि त्याच देशाला वाचवू शकतील, असं आग्रही प्रतिपादन त्यांनी केलं.

ईशान्य भारताला हवाय देशभरातून पाठींबा – डॉ. रोजमेरी झुविचू

नागालँड मधील जेष्ठ कार्यकर्त्या **प्रा. डॉ. रोजमेरी झुविचू** यानी नागालँड मध्ये चालू असलेल्या जन चळवळीचा थोडक्यात आढावा घेतला. ६० वर्षांपासून नागालँड, मणिपूर आणि आसाम या ईशान्य भारतातील राज्यात AFSPA (Armed Forces (Special Power) Act) कायद्यान्वये भारतीय सैन्याला दिलेल्या विशेष अधिकाराविरुद्ध चाललेल्या लढ्याचा उल्लेख करुन त्या म्हणाल्या की, हा कायदा रद्द व्हायला हवा. या कायद्याने दिलेल्या अनिर्बंध अधिकारांमुळे तिथल्या स्थानिकांवर आणि विशेषत: स्त्रियांवर अनन्वित अत्याचार होत आहेत. त्याच बरोबर UAPA आणि AWA (Another War Act) हे कायदेही रद्द व्हायला हवेत. त्यांच्या लढ्यात त्यांच्या बरोबर देशातील अनेक संघटना सहभागी झाल्या आहेत. गेल्या दीड वर्षांपासून मणिपूरमध्ये सुरू असलेल्या महिलांवरील अत्याचार, बलात्कार आणि इतर प्रकारच्या हिंसाचाराविरोधात स्थानिक लोक, संघटना आणि महिला संघटना सक्रियपणे लढत आहेत.

त्या पुढे म्हणाल्या की, आम्हाला लोकशाही हवी आहे, न्यायव्यवस्था व्यवस्थित चालली पाहिजे, परंतु सध्याच्या परिस्थितीत तसे होताना दिसत नाही. अनेक प्रश्न समोर आहेत. मग तो मोठ्या कंपन्यांविरुद्धचा संघर्ष असो किंवा संपूर्ण कॉर्पोरेटायझेशनचा मुद्दा असो. तिथे असे लोक आहेत जे सातत्याने लढा देत आहेत. महिलांनी विशेष आरक्षणासाठी मोठ्या संघर्षानंतर सर्वोच्च न्यायालयात जाऊन विजय मिळवला. त्यामुळे, आम्ही या सर्व संघर्षांमध्ये सहभागी आहोत आणि भारतातील अन्य भागातील जन चळवळींना आमचा पाठिंबा आहे. देशभरातील जन संघटना ईशान्य भारतातील संघर्षाला पाठिंबा देऊ शकत असतील, तर आमची एकता अधिक बळकट होईल, असा आशावाद त्यांनी प्रकट केला.

लडाखच्या जनतेला संविधानिक आणि पर्यावरणपूरक विकास हवाय – सोनम वांगचूक

आपल्या देशाच्या चीन लगतच्या सीमेवर असलेल्या महत्वपूर्ण अशा लडाख क्षेत्राच्या पर्यावरणाच्या आणि स्थानिकांच्या जीवन प्रणालीच्या, संस्कृतीच्या रक्षणासाठी गेले वर्षभर आंदोलन करणारे सुप्रसिद्ध शैक्षणिक तज्ज्ञ आणि सतत नवीन शैक्षणिक आणि तंत्रज्ञानिक प्रयोग करणारे **सोनम वांगचूक** या वेळी उपस्थित होते. NAPM च्या ३० व्या वर्धापन दिनाच्या सदिच्छा व्यक्त करुन ते म्हणाले की भारताच्या काना कोप्रयात अन्यायाविरुद्ध लढणारे कार्यकर्ते इथे एकत्र आले आहेत, लोकशाही वाचवण्यासाठी सक्रीयपणे सहभागी होत आहेत हे बघून अतिशय आनंद होतो

आहे. अशा जन चळवळी थेट लोकशाहीचे उत्कृष्ट उदाहरण ठरतात. ज्या देशात लोकशाहीचा खऱ्या अर्थाने सन्मान केला जातो, अशा सरकारांसाठीही ही प्रक्रिया अत्यंत फायदेशीर ठरते, कारण अशा चळवळी सरकारला जनतेच्या इच्छांची जाणीव करून देतात. सरकार जर काही विशिष्ट हितसंबंधांच्या बाजूने झुकत असेल, तर अशा लोक चळवळी संतुलन राखण्याचे काम करतात.

लडाख मध्ये 'लडाख वाचवा' या मागणीसाठी मोठ्या संख्येने लोक रस्त्यावर आंदोलन करत होते आणि अद्यापही ते सुरू आहे. जन आंदोलनाच्या माध्यमातून विविध राज्यातील अनेक प्रतिनिधींनी लडाखच्या जनतेला प्रत्यक्ष तिथे येऊन, काहींनी आपल्या राज्यात उपोषण करत पाठिंबा दिला. NAPM चे साथीही त्यावेळी लडाख मध्ये येऊन गेले. परदेशातूनही अनेक जणांनी आमच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला. आम्ही सद्या सर्व समर्थकांची आभार मानण्यासाठी सर्वत्र दौऱ्यावर आहोत. इथे येण्याचे ते ही एक महत्त्वाचे कारण आहे.

याच संदर्भात, आम्ही नुकतेच अमेरिकेतील न्यूयॉर्कहून परतलो आहोत, जिथे आम्ही संयुक्त राष्ट्रसंघाचे आभार मानले. हवामान बदलाच्या दुष्परिणामांचा विचार करता, उंच पर्वतरांगांमध्ये राहणाऱ्या आणि हिमनद्यांवर अवलंबून असलेल्या आमच्यासारख्या लोकांच्या संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने २०२५ हे आंतरराष्ट्रीय हिमनदी संरक्षण वर्ष म्हणून घोषित केले आहे. ही घोषणा केवळ लडाखमधील लोकांसाठीच महत्त्वाची नाही, तर संपूर्ण पृथ्वीवरील आणि भारतीय उपखंडातील लोकांसाठीही अत्यंत आवश्यक आहे. विशेषत:, उत्तरेकडील तिबेट आणि चीनसह सुमारे २०० कोटी लोक थेट या हिमनद्यांवर अवलंबून आहेत, जे जगाच्या लोकसंख्येच्या जवळपास एक चतुर्थांश आहेत. त्यामुळे या हिमनद्यांचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने जगाला या संवेदनशील विषयावर पाऊल उचलण्याचा आणि हिमनद्यांचे संरक्षण करण्याचा संदेश दिला, ही बाब लडाखच्या संघर्षासाठीही महत्त्वाची ठरते. म्हणूनच, आम्ही त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

लडाखमधील लोक अनेक वर्षांपासून मागणी करत आहेत की येथे राहणाऱ्या आदिवासी समाजासाठी संविधानाने दिलेले संरक्षण लागू व्हावे. लडाखच्या ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या आदिवासी समुदायांची आहे. हा प्रदेश पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून तर संवेदनशील आहेच, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे येथील स्थानिक लोकांचा जीवनप्रवाह आणि विचारसरणी देखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळे, या भागाचे आणि येथील संस्कृतीचे संरक्षण करण्यासाठी संविधानात दिलेले अधिकार स्थानिक लोकांना मिळाले पाहिजेत.

२०१९ मध्ये, जेव्हा लडाखला स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश बनवण्यात आले आणि जम्मू–काश्मीरपासून वेगळे करण्यात आले, तेव्हा सरकारने मोठ्या सभांमध्ये जाहीरपणे सांगितले होते की लडाखला संविधानाच्या सहाव्या अनुसूचीनुसार संरक्षण देण्याचा विचार सुरू आहे. केवळ चर्चांपुरतेच नव्हे, तर सरकारने याबाबत ठाम आश्वासन दिले होते. लोकशाही व्यवस्थेमध्ये दिलेली आश्वासने पूर्ण करणे ही एक जबाबदारी असते आणि लोकांचा सरकारवर विश्वास कायम ठेवण्याचा हा मुख्य पाया असतो.

राष्ट्रीय अनुसूचीत जाती आणि जनजाती (SC/ST) आयोग आणि आदिवासी आयोगाच्या इतिवृत्तांमध्येही असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, सरकार लडाखला सहाव्या अनुसूचीनुसार संरक्षण देणार आहे. विशेषत: आदिवासी मंत्रालयानेही वेळोवेळी याबाबत स्पष्ट विधान केले आहे. मात्र, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर, परिस्थिती वेगळी दिसू लागली आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या जाहीरनाम्यात लडाखच्या संवैधानिक संरक्षणाचा मुद्दा सर्वाधिक महत्त्वाच्या मुद्द्यांपैकी एक म्हणून छापण्यात आला होता. एवढेच नव्हे, तर २०२० मध्येही भाजपने आपल्या जाहीरनाम्यात लडाखसाठी सहाव्या अनुसूचीच्या संरक्षणाचा प्रस्ताव क्रमांक एक म्हणून ठेवला होता. हे लोकांना दिलेले ठोस आश्वासन होते. लडाखच्या जनतेने भाजपवर विश्वास ठेवून लोकसभा आणि हिल कौन्सिलच्या निवडणुका मोठ्या बहुमताने जिंकून दिल्या. लोकांनी पर्यावरण आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी हे मतदान केले. लोकांना वाटले की, सरकारने आश्वासन दिले आहे, तर ते पूर्ण होईल. मात्र, निवडणुकीनंतर पहिल्या वर्षभरात या मुद्द्यावर शांतता पसरली. जेव्हा दुसऱ्या वर्षी लोकांनी सरकारला दिलेल्या आश्वासनाची आठवण करून दिली, तेव्हा परिस्थिती बदलली. सरकारकडून लोकांना विरोध सहन करावा लागला. काही लोकांना

धमक्या दिल्या गेल्या. काहींना पोलिसांनी चौकशीसाठी नेले आणि लोकांच्या मागण्यांना देशविरोधी ठरवण्याचा प्रयत्न झाला.

सरकारकडून लडाखच्या मागण्यांना पाकिस्तान आणि चीनशी जोडण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र, हा आरोप निराधार आहे, कारण ही मागणी सरकारनेच निवडणुकीपूर्वी प्रस्तावित केली होती आणि ती भारतीय संविधानाच्या चौकटीत पूर्णत: वैध आहे. लोकशाहीमध्ये सरकारने स्वत: दिलेली आश्वासने पाळणे अत्यावश्यक असते. लडाखच्या जनतेची ही मागणी बेकायदेशीर नाही, तर भारतीय संविधानात दिलेल्या अधिकारांवर आधारित आहे. सरकारने लडाखच्या सहावी अनुसूचीतील संरक्षणाबाबत दिलेल्या आश्वासनांवर दोन वर्षांत कोणताही ठोस निर्णय घेतला नाही. कधी लेखी उत्तर दिले गेले नाही, कधी स्पष्टीकरणही देण्यात आले नाही.

मात्र, घडलेल्या घटनांवरून स्पष्ट होते की, या कालावधीत सरकारवर मोठा दबाव निर्माण झाला होता, ज्यामुळे आश्वासने पाळली गेली नाहीत. या दबावाचा स्रोत इंडस्ट्रियल लॉबी असल्याचे स्पष्ट संकेत मिळतात. देशातील मोठे कॉर्पोरेट समूह, जे पर्यावरणाच्या विनाशातून मोठा नफा कमवत आहेत, तेच या निर्णयावर प्रभाव टाकत आहेत. हे कॉर्पोरेट केवळ नफा मिळवण्यासाठीच नव्हे, तर लोकांच्या आशा आणि मागण्यांकडे दुर्लक्ष करत लडाखच्या नैसर्गिक संसाधनांवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.

लडाखमध्ये मोठ्या प्रमाणावर ऊर्जा प्रकल्पांची योजना आखली जात आहे. विशेषत: सौरऊर्जा प्रकल्प, जो जगातील सर्वात मोठ्या सौर प्रकल्पांपैकी एक ठरणार आहे. सौर ऊर्जा ही पर्यावरणपूरक आणि देशासाठी उपयुक्त असल्याने तिच्याविरोधात कोणताही आक्षेप नाही. लडाखचे हवामान आणि भूगोल सौरऊर्जा निर्मितीसाठी अत्यंत अनुकूल आहे. तथापि, या प्रकल्पाचा आकार अत्यंत मोठा असून, तो केवळ एक साधा ऊर्जा प्रकल्प राहणार नाही. तो जगातील सर्वात मोठ्या सौर प्रकल्पांपैकी एक असणार आहे. हा प्रकल्प सुमारे ३,००० मेगावॅट क्षमतेचा असेल, जो सध्याच्या सर्वात मोठ्या प्रकल्पाच्या तिप्पट ते चौपट असणार आहे. त्यामुळे, लडाखच्या पर्यावरणावर आणि लोकजीवनावर त्याचा मोठा प्रभाव पडणार आहे.

लडाखमध्ये प्रस्तावित सौरऊर्जा प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात जमीन ताब्यात घेतली जात आहे. हा प्रकल्प केवळ देशाच्या दृष्टीने वाईट नाही, तर स्थानिक मेंढपाळांच्या अस्तित्वावर गंभीर परिणाम करणारा आहे. लडाखमधील मेंढपाळ केवळ स्वत:साठीच नव्हे, तर देशासाठीही इथल्या पाश्मिना लोकरीच्या उत्पादनातून मोठा परकीय चलन स्रोत आहेत. हा प्रकल्प १५० चौरस किलोमीटर एवढ्या विस्तीर्ण भूभागावर उभारला जाणार आहे, ज्यामुळे अनेक मेंढपाळ बेघर होतील. परकीय चलन मिळवून देणाऱ्या पश्मिना लोकरीच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होईल.

आज संघर्षाची चुकीची मांडणी केली जात आहे. लडाखच्या जनतेला पर्यावरणपूरक विकास हवा आहे, मात्र आम्ही विकासविरोधी असल्याचा अपप्रचार केला जात आहे. सरकारलाही कॉर्पोरेट कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात दबाव येतो, कारण त्यांचा निवडणुकांमध्ये मोठा आर्थिक पाठिंबा असतो. त्यामुळे, जर लोकांचा विरोध नसेल, तर सरकार सहजच उद्योगपतींच्या बाजूने झुकते. तरीही, लोकशाहीमध्ये लोकचळवळी सरकारला योग्य मार्गावर आणू शकतात. म्हणूनच, लडाखमधील नागरिक हा लढा लोकशाही मार्गाने लढत आहेत. यामध्ये संपूर्ण भारतातून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे. लडाखच्या संघर्षात देशभरातील नागरिक सहभागी झाले आहेत, आणि यामुळे सरकारलाही तो गांभीर्याने घ्यावा लागत आहे.

संघर्ष आणि निर्माण दोन्ही आवश्यक - आशिष कोठारी

सुप्रसिद्ध पर्यावरणवादी आणि 'कल्पवृक्ष'. 'विकल्प संघम' या पर्यावरणावर आणि वैकल्पिक विकासा संदर्भात काम करणाया संस्थांचे संस्थापक आशिष कोठारी या वेळी हवामान बदल आणि पर्यावरणाचे संरक्षण या विषयावर बोलले. ते म्हणाले, पृथ्वीवर हिंसा होत आहे, तसेच इतर जीवजंतूंवरही मोठ्या प्रमाणात हिंसा होत आहे. जर आपण या सर्व गोष्टींचा विचार केला, तर संघर्ष हा केवळ आवश्यक नाही, तर तो एक नैसर्गिक प्रतिसाद आहे. हा आपल्या परिस्थितीला दिलेला दैनंदिन प्रतिसाद आहे एका प्रकारे प्रतिकार करण्याची प्रक्रिया आहे, कारण आपण सध्या मोठ्या संकटांच्या गर्तेत आहोत. हे संकट पर्यावरणीय आहे, हवामान बदलाचे आहे, विषमतेचे आहे, युद्धांचे आहे मग ते पॅलेस्टाईन असो, युक्रेन असो किंवा इतर कोणतेही ठिकाण असो. आपल्या दैनंदिन जीवनातील हिंसा वैयक्तिक पातळीवर

असो किंवा जागतिक पातळीवर, त्याचा सामना करणे ही आपली जबाबदारी आहे. संघर्ष सुरूच आहे आणि तो सुरू राहणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु या संघर्षाच्या जोडीला निर्माणाचीही प्रक्रिया तितकीच महत्त्वाची आहे. लोकांमध्ये सकारात्मक पर्याय उभारण्याची मानसिकता तयार होत आहे, आणि त्यासाठी जे प्रयत्न सुरू आहेत, त्याकडेही आपण लक्ष देणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले, इथे उपस्थित असलेल्या लोकांपैकी अनेकजण संघर्ष आणि निर्माण या दोन्ही प्रक्रियांमध्ये गुंतलेले आहेत. आपल्यासोबत इथे लक्ष्मम्मा आणि नरसम्मा उपस्थित आहेत, त्या डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीच्या दलित महिला कार्यकर्त्या आहेत. त्यांच्या समुदायाचे स्वत:चे मीडिया स्टेशन आहे, जे संपूर्णपणे लोकशाही माध्यम आहे. गेल्या ३५ वर्षांत, या दलित महिलांनी आपली पारंपरिक शेती सेंद्रिय शेतीकडे वळवली. अन्नसुरक्षा निर्माण केली आणि 'अन्नस्वराज्य' चा विचार प्रत्यक्षात आणला. जातीभेद आणि अन्यायग्रस्त परिस्थितीतून बाहेर पडून त्यांनी स्वत:च्या उत्पादन व्यवस्थेवर हक्क मिळवला. त्यांनी गडचिरोली जिल्ह्यात आदिवासींनी आपल्या जंगलाला वाचवण्यासाठी केलेल्या संघर्षाचे उदाहरण दिले. गडचिरोली जिल्ह्यात ३०-४० वर्षांपूर्वी दोन मोठ्या जलविद्युत प्रकल्पांविरोधात ३०० आदिवासी गावांनी लढा दिला आणि ते प्रकल्प रोखण्यात यश मिळवले. ते स्वत:, बाबा आमटे, स्वामी अग्निवेश आणि नर्मदा आंदोलनातील अनेक कार्यकर्ते त्या संघर्षात सहभागी होतो. 'तुमच्यासाठी नदी म्हणजे एक वस्तू आहे, पण आमच्यासाठी ती आई आहे', असे आदिवासींनी सरकारला स्पष्टपणे सांगितले. त्या आंदोलनातून पुढे महाग्रामसभा संकल्पना निर्माण झाली, जिथे संपूर्ण गाव एकत्र येऊन स्वशासनाचा निर्णय घेतात, खाणकामाला विरोध करतात आणि स्त्रिया व लहान मुलांचाही निर्णयप्रक्रियेत समावेश असतो.

त्यांनी कुर्द समुदायाच्या लढ्याची माहिती देताना सांगितले की इराण, इराक, सीरिया आणि तुर्कस्तानच्या सीमांवर सुमारे ४ कोटी कुर्द लोकांचे मोठे स्वायत्ततावादी आंदोलन सुरू आहे. त्या आंदोलकांनी असा विचार मांडला आहे की, 'आम्हाला स्वतंत्र देश नको, पण आमच्या प्रदेशात कोणतीही केंद्रीकृत सत्ता नको. आम्ही गावोगाव, विभागवार लोकशाही स्वशासन उभारू.' या कुर्द चळवळीत फक्त कुर्द नव्हे, तर अरब, ख्रिश्चन आणि इतर समुदायही एकत्र आले आहेत. त्यांच्या कल्पनेनुसार प्रत्येक गावे, कसबे स्वत:चे निर्णय घेतील, आणि त्यानंतर हे सर्व स्वायत्त प्रदेश एकत्र येऊन मोठे लोकशाही स्वराज्य तयार करतील.

ही उदाहरणे देऊन ते म्हणाले की यातून काही महत्त्वाचे आणि रोचक तत्त्व सिद्ध होतात. या तत्त्वांना आपण एका फुलाच्या पाकळ्यां प्रमाणे पाहू शकतो प्रत्येक पाकळी एकमेकांशी जोडलेली आहे आणि सर्व मिळून एक सुंदर फूल तयार करते. याला आपण 'परिवर्तनाचे फूल' म्हणू शकतो, आणि त्याची ५ मुख्य तत्वे आहेत.

थेट लोकशाही (Direct Democracy): लोकशाही म्हणजे पाच वर्षांतून एकदा मतदान करणे नाही. जर आपली निवडलेली सरकार योग्य काम करत नसेल, तर आपण पाच वर्षे थांबायचे आणि मग दुसऱ्या पक्षाला मतदान करायचे, ही लोकशाही नव्हे. सध्याच्या सरकारला पारदर्शक आणि जबाबदार बनवण्याचा लढा महत्त्वाचा आहे. पण त्याचवेळी खरी लोकशाही ही गावे, शहरे, कसबे याठिकाणी लोकांनी स्वत: सरकार चालवण्यात आहे. या वेळी त्यांनी गडचिरोली महाग्रामसभा, मेंढा – लेखा गावातील ग्रामसभा, कुर्द आंदोलन यांची स्वयं निर्णय अधिकार हातात घेऊन यशस्वी झाल्याची उदाहरणे दिली.

आर्थिक लोकशाही (Economic Democracy): आर्थिक संसाधनांवर नियंत्रण हे ना सरकारकडे असावे, ना भांडवलदारांकडे, तर ते लोकांच्या आणि समुदायांच्या ताब्यात असावे. संपत्तीवर स्थानिकांचा हक्क: जमीन, पाणी, जंगल, खाणी यावर भांडवलदार नव्हे, तर स्थानिक समुदायांचा हक्क असावा. उत्पादनाचे साधन उत्पादकांकडे असावे: शेतजमीन शेतकयांकडे, कारखान्यांतील यंत्रसामग्री कामगारांकडे, कुंभाराच्या हातात चाक हे उत्पादनाचे लोकशाहीकरण आहे. सामुदायिक मालकी: प्रत्येक गोष्ट खासगीकरणाच्या दिशेने न नेता, सामुदायिक व्यवस्थापनात आणली पाहिजे. प्रकृतीच्या नियमांशी सुसंगत अर्थव्यवस्था: सध्या नफा आणि वाढीवर आधारित अर्थव्यवस्था ही पर्यावरणाचा नाश करणारी आहे. याउलट, समुदाय आणि निसर्ग यांच्या सहजीवनावर आधारित आर्थिक प्रणाली निर्माण झाली पाहिजे.

सामाजिक न्याय (Social justice): रोजमेरी यांनी

नागालँडमधील महिलांच्या आंदोलनाबद्दल सांगितले, तसेच इतर ठिकाणी जातिवादाविरोधात आणि दलितांच्या हक्कांसाठी सुरू असलेल्या चळवळींबद्दलही. जुन्या आणि नव्या असमानतेविरोधातील संघर्ष, समानतेच्या दिशेने वाटचाल हाही परिवर्तनाचा एक महत्त्वाचा आयाम आहे.

भाषिक आणि ज्ञानसंपत्तीचे संरक्षण (Knowledge & Language Diversity): लडाखमध्ये सुरू असलेले भाषा, संस्कृती आणि ज्ञान टिकवण्याचे आंदोलन खूप महत्त्वाचे आहे. भारतात सध्या ७८० भाषा आहेत, पण अन्याय असा झाला आहे की, कच्छीला गुजरातीची बोली मानले जाते, सिंधीला हिंदीची. लडाखी भाषेचे अधिकृतपणे स्थान आहे की नाही हेही स्पष्ट नाही. ७८० भाषा या केवळ बोल्या नाहीत, त्या पूर्ण विकसित भाषा आहेत. पण आपल्या शिक्षण व्यवस्थेत केवळ २२ भाषांना स्थान आहे. बहुतांश आदिवासी भाषा शालेय शिक्षणातून हद्दपार केल्या आहेत. गोंडी भाषेच्या बाबतीत थोडे प्रयत्न झाले असतील, पण इतर अनेक भाषा पूर्णपणे शिक्षण व्यवस्थेतून बाहेर टाकल्या गेल्या आहेत. याचा अर्थ भाषांची विल्हेवाट लागत आहे, आणि त्याचबरोबर त्या भाषांमध्ये असलेले ज्ञानदेखील नष्ट होत आहे. भाषातज्ज्ञ गणेश देवी यांनी एकदा मला सांगितले होते की, हिमाचल प्रदेशात "बर्फ"साठी २३० वेगवेगळे शब्द आहेत. बर्फ कधी पडतो, किती वेगाने वितळतो, त्याच्या प्रकारांनुसार वेगवेगळे शब्द आहेत. जर आपण मुलांचे शिक्षण त्यांच्या मातृभाषेतच घेतले नाही, तर हे संचित ज्ञान पुढच्या पिढीपर्यंत पोहोचणार नाही आणि ते कायमचे हरवेल. हवामान बदलाच्या संकटाविरोधात लढताना हे स्थानिक ज्ञान अतिशय महत्त्वाचे आहे.

निसर्ग आणि पर्यावरण (Nature & Environment): सर्व धर्म, संस्कृती सांगतात की निसर्ग आपल्यासाठी केंद्रस्थानी असला पाहिजे. पण आपली कृती तशी आहे का ? जे स्थानिक आदिवासी आणि समुदाय अजूनही निसर्गाशी जोडलेले आहेत, त्यांना विकासाच्या नावाखाली हुसकावून लावले जाते. २०२० पासून 'आत्मनिर्भर भारत' हे धोरण जोरात पुढे नेले जात आहे. पण यात आपण लक्ष द्यायला हवे हे स्वावलंबन कोणासाठी ? कोळसा खाणींमध्ये अधिक गुंतवणूक करणे, जंगल नष्ट करून प्रकल्प उभारणे, हेच जर सरकारचे स्वावलंबन असेल, तर त्यात स्थानिक आदिवासींचे काय ? मोदी सरकारने 'LiFE-Lifestyle for Environment' नावाची मोहीम जाहीर केली. कागदावर हे छान दिसते २० पानांचा दस्तऐवज तयार करण्यात आला आहे. यात नागरिकांनी कमी प्रदूषण करणारे जीवनशैली अवलंबावी, असे सांगण्यात आले आहे. गाड्यांऐवजी सायकल चालवा, एसीऐवजी पंखा वापरा हे सुचवले जात आहे. पण उद्योगपतींनी काय करावे याचा उल्लेखच नाही ! रिलायन्स, अदानी, टाटा यांचे पर्यावरणाबाबत कोणते बंधन आहे ? त्यांच्या जीवन शैलीत काही नियम आहेत का ? ही विरोधाभासाने भरलेली योजना आहे. सरकार म्हणते, पर्यावरणपूरक धोरणे राबवू, पण त्याच वेळी ग्रेट निकोबारच्या अरण्यात १३० चौरस किमी जंगल उद्ध्वस्त करून मोठे औद्योगिक प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला जातो. या जंगलात २००० हून अधिक वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती आहेत. त्यांना लोकशाहीमध्ये स्थान मिळेल का ?

या पाच आयामांना जर आपण एका फुलाच्या पाकळ्यांसारखे पाहिले, तर या फुलाच्या केंद्रस्थानी मूल्ये आहेत प्रेम, सहभाव, विविधता, समता आणि सामूहिक कार्य. खरी क्रांती ही फक्त क्रांतिकारी पक्ष निवडून देण्याने येत नाही. समाजाच्या तळागाळात आपण स्वत: कोणते बदल घडवू शकतो, हे अधिक महत्त्वाचे आहे. त्यांनी शेवटी, "जिन जियान आजादी !" (जिन – स्त्रिया, जियान – जीवन, आणि आजादी – स्वातंत्र्य) ही घोषणा दिली.

आता मानसिक स्वातंत्र्यासाठीही लढायला हवं - ॲड. **शाहरूखजी आलम**

सुप्रीम कोर्ट वकील आणि सामाजिक कार्यकर्त्या शाहरूखजी यांनी, मानसिक स्वातंत्र्यासाठी आता लढा द्यावा लागेल असे सांगत त्या पुढे म्हणाल्या की, आम्ही मुस्लिम आहोत, लेफ्ट लिबरल आहोत 'भारत माता की जय' सारखा नारा जर आमचा अनावधाने चुकला तर आम्ही लगेच अडचणीत येऊ शकतो. आम्हाला खूप सावध राहवं लागतं. सतत चिंता वाटतं राहते, 'अरे, काही चुकलं का ? नारा चुकला का ? ते रेकॉर्ड झालं असेल का ? अडचण होईल का ?'

राइट टू रेस्ट- मानसिक स्वातंत्र्यासाठी लढा; शाहरूखजी म्हणाल्या कामगार चळवळींनी सहा दिवस कामाचा हक्क मिळवला पण आता तुम्हाला मानसिक स्वातंत्र्यासाठी पुन्हा लढा द्यावा

लागेल असं वाटतंय. जर तुम्हाला नारा देण्याआधी भीती वाटत असेल तर विचार करायला हवा की भाषा आणि अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य खरंच उरलंय का ? त्यांनी तीन उदाहरणे दिली;

उत्तराखंड मध्ये लागू झालेला यूनिफॉर्म सिविल कोड कायदा हा खरच यूनिफॉर्म आहे का ? नाही. फोकस वेगळ्याच गोष्टींवर आहे. उत्तराखंडमधल्या सर्व लिव्ह–इन कपल्सचा डेटा स्थानिक मॅजिस्ट्रेटकडे द्यावा लागणार आहे. काही लोकांनी हायकोर्टात आव्हान दिलंय की "ही काय गरज ?" तिथं राज्य सरकारनं युक्तिवाद केला की "हे स्त्रियांचं संरक्षण करण्यासाठी आणि मुलांचं भलं करण्यासाठी आवश्यक आहे." कोर्ट म्हणालं, "बरं, ऐकतोय..." याचा अर्थ असा की इथे प्रायव्हसी नाही. राज्य म्हणतंय की "हे तुमच्या संरक्षणासाठी आहे." पण, त्याच दिवशी सकाळी दुसऱ्या प्रकरणात पंतप्रधानांची डिग्री सार्वजनिक करावी की नाही, यावर वाद झाला. त्याच राज्याने युक्तिवाद केला की "हा प्रायव्हसीचा मुद्दा आहे, राष्ट्रीय सुरक्षेचाही प्रश्न आहे!" तर लिव्ह–इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्यांना प्रायव्हसी नाही, पण पंतप्रधानांच्या डिग्रीला मात्र प्रायव्हसी आहे ?

सुप्रीम कोर्ट आणि बॉडी शेमिंग. एका महिलेच्या जामीन अर्जावर सुनावणी सुरू होती. वकिलाने सांगितलं की तिला काही वैद्यकीय समस्या आहेत कारण ती ओव्हरवेट आहे. त्यावर कोर्ट म्हणालं "बरं आहे, मग जेलमध्ये ठेवा, वजन कमी होईल!" मग लोकांचा संताप झाला की हे बॉडी शेमिंग आहे. पण हा खरा मुद्दा नाही !

खरा मुद्दा म्हणजे सुप्रीम कोर्ट असं कसं बोलू शकतं ? फिल्म 'छावा' आणि सरकारचा दुटप्पीपणा. या सिनेमात एक प्रसंग आहे जिथं छत्रपती संभाजी महाराज औरंगजेबाला थेट सांगत आहेत 'तू चुकीचं करत आहेस!' आणि मी विचार करत होते 'अरे, हा माणूस असं बोलतोय, आणि लोक ऐकून घेत आहेत ?'

आजकाल लोकांना सरकारविरोधात बोलू दिलं जातं का ?

सरकार विरुध्द बोलल्यामुळे उमर खालिद, साईबाबा, गौतम नवलखा.. हे लोक अजून तुरुंगात आहेत. जेव्हा लोक विचार करतात, लिहितात, बोलतात, तेव्हा संध्याकाळी लोकं त्यांच्याबद्दल म्हणतात "हे साले देशद्रोही आहेत! सरकारला काम करूच देत नाहीत!" राज्याची दडपशाही आता उघडपणे होतेय. पूर्वीही राज्य हिंसक होतं. पूर्वीही लोकांना अटक केली जात असे, लाठीचार्ज होत असे. पण काहीतरी ठोस न्याय्य प्रक्रिया असतिवाट होत्या उदाहरणार्थ चौकशी, रिपोर्ट, ट्रायल... आता ? राज्याला काहीही करायचं असेल, तर त्यासाठी एकच कारण लागतं 'हा आतंकवादी आहे!' जर राज्याने ठरवलं की 'तुम्ही आतंकवादी आहात,' तर तुमचं घर उद्ध्वस्त होऊ शकतं, तुम्हाला एन्काऊंटर केला जाऊ शकतो, तुम्हाला तुरुंगात टाकलं जाऊ शकतं आणि सामान्य लोक म्हणतात 'बरं झालं!'

मनाची गुलामी सुरू झालीये. आजकाल लोकांना नुसतं शरीराने नाही, तर मनानेही गुलाम केलं जात आहे. जर तुम्ही रस्त्यावर रोहिंग्या निर्वासितांना मदत केली, तर तुमच्यावर कारवाई होईल. 'अरे, त्यांना मदत करायला जायचं नाही, नाहीतर देशद्रोही ठरवलं जाईल!' खरा प्रश्न आहे लोकशाहीचं काय ? जर कोणालाही अटक होऊ शकते, कोणालाही देशद्रोही ठरवलं जाऊ शकतं, तर लोकशाही खरंच शिल्लक राहिली आहे का ? संघर्षाची गरज आहे! लोकांनी आराम सोडला पाहिजे. कामगार चळवळी जशा वेतन आणि कामाचे हक्क मिळवण्यासाठी लढल्या, तसंच आता मानसिक स्वातंत्र्यासाठीही लढायला हवं!

बस्तरला केवळ शांततेची नव्हे, तर न्यायाची गरज आहे - ॲड. बेला भाटिया

बस्तर जिल्ह्यात मानवाधिकार वकील असणाऱ्या ॲड. बेला भाटिया लेखकही आहेत. बस्तर मधल्या नक्षलवादी चळवळींबद्दल त्यांचा सखोल अभ्यास आहे. बस्तर मध्ये चाललेल्या सरकारी कारवायांबद्दल माहिती देताना त्या म्हणाल्या, बस्तरमधील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. तिथे सरकार आणि माओवाद्यांमध्ये वर्षानुवर्षे चाललेला संघर्ष स्थानिक आदिवासी समुदायासाठी विनाशकारी ठरत आहे. २००५ पासून सुरू झालेल्या या अंतर्गत युद्धात हजारो आदिवासी मारले गेले, अनेक महिलांवर अत्याचार झाले, आणि संपूर्ण गावे उद्ध्वस्त झाली. सरकार अधिकृतपणे याला "युद्ध" म्हणत नाही, कारण आंतरराष्ट्रीय कायद्यांमुळे ते अडचणीत येऊ शकते. पण वस्तुस्थिती अशी आहे की बस्तर आता एक लष्करी छावणीसारखा बनला आहे, जिथे प्रत्येक १००

नागरिकांमागे एक पॅरामिलिटरी जवान आहे.

सालवा जुडूमपासून ग्रीन हंट आणि आता ऑपरेशन कागारपर्यंत विविध मोहिमा राबवल्या गेल्या. हजारो कुटुंबे विस्थापित झाली, जंगलात राहणाऱ्या लोकांची घरे जाळण्यात आली, आणि मोठ्या प्रमाणावर अटकसत्रे सुरू झाली. पोलिस आणि पॅरामिलिटरी दल बस्तरमध्ये कोणत्याही कायदेशीर बंधनांशिवाय कार्यरत आहेत. बऱ्याचवेळा निष्पाप आदिवासींना माओवादी ठरवून मारले जाते किंवा अटक केली जाते.

गेल्या काही महिन्यांपासून ही स्थिती अधिकच बिघडली आहे. अनेक गावांमधून मोठ्या संख्येने लोकांना पकडले जात आहे, त्यांना खोट्या चकमकींमध्ये मारले जात आहे. बाजारात गेलेल्या, शेतात काम करणाऱ्या किंवा जंगलात तेंदूपत्ता गोळा करणाऱ्या लोकांनाही उचलून नेले जाते. काही वेळा पोलिस चकमक घडवून आणतात आणि त्यात गावकरीही मारले जातात. अशा अनेक घटनांमध्ये सुरुवातीला पोलिस मृतदेह उचलायलाही परवानगी देत नाहीत. नातेवाईकांना लांबवरून चालत जाऊन मृतदेह आणावा लागतो.

सर्वात मोठी शंका म्हणजे हे सर्व केवळ माओवाद्यांविरुद्ध कारवाईसाठी नाही, तर बस्तरमधील खनिज संपत्तीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आहे. बस्तरमध्ये मोठ्या प्रमाणावर लोहखनिज, सोनं आणि इतर मौल्यवान खनिजे आहेत. अनेक खाणी आधीच खासगी कंपन्यांना दिल्या गेल्या आहेत, आणि आता आणखी मोठ्या कंपन्या तिथे येण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे माओवाद्यांच्या नावाखाली स्थानिक आदिवासींच्या जमिनी बळकावल्या जात आहेत. नवीन लष्करी छावण्या बहुतेकदा अशा भागांमध्ये उभ्या राहतात जिथे खाणींची योजनाच सुरू असते.

बस्तरला केवळ शांततेची नव्हे, तर न्यायाची गरज आहे. आदिवासींचे हक्क, त्यांची जमीन, जंगल आणि जीवनशैली सुरक्षित राहिली पाहिजे. कार आणि माओवाद्यांमध्ये संवाद सुरू झाला पाहिजे, पण तो केवळ सरकारच्या अटींवर नव्हे, तर आदिवासी समाजाच्या न्याय्य मागण्यांच्या आधारे हवा. युद्धाने कोणतेही प्रश्न सुटत नाहीत, ते केवळ अधिक मोठ्या संकटांना जन्म देतात. बस्तरमधील परिस्थिती बदलण्यासाठी देशभरातून लोकांनी आवाज उठवणे अत्यंत गरजेचे आहे.

जन आंदोलनांनी जनसंसद उभारायला हवी – मेधा पाटकर

मेधा पाटकर यांनी आपल्या भाषणात सर्व वक्त्यांनी मांडलेल्या वस्तुस्थितीचा, समस्यांचा आढावा घेतला. त्या म्हणाल्या, आज हरगोपालजींसह इतर सर्वांनी जी जमिनीवरची वस्तुस्थिती मांडली आहे नागालँडपासून बस्तरपर्यंत ती अतिशय महत्त्वाची आहे. याच गोष्टींमधून स्पष्ट होते की जनआंदोलनांची एकता आणि राष्ट्रीय समन्वय का आवश्यक आहे. नाहीतर '३० वर्ष बेमिसाल' असे म्हणत आपण पुढे जाऊ शकतो, पण मग ही हत्याकांडे, संविधानाची पायमल्ली, मानवाधिकारांचे उल्लंघन याला रोखायचे का नाही ? याच दिशेने नफालक्षी विकास म्हणजेच 'प्रॉफिट ओव्हर नेचर', म्हणजेच निसर्गावर मुनाफेखोरी आणि मानवतेला चिरडणे याला आपण रोखू शकत नाही का ? जात आणि धर्माला अस्त्र म्हणून वापरून हिंसा भडकवणे आपण केवळ पाहत राहणार का ?

बस्तर, नागालँड आणि लडाखमध्ये संविधानाच्या मुलभूत तत्त्वांचे उल्लंघन होत आहे. नदी वाचवायची असो, जमीन वाचवायची असो, हक्क टिकवायचे असोत आंदोलन अपरिहार्य आहे. संसद आपली नसेल, पण जनसंसद उभाराविच लागेल. भूतपूर्व न्यायाधीश, पर्यावरणतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञसर्वांचा सहभाग घ्यावा लागेल. नर्मदा बचाव आंदोलनात अनेक अहवाल दाखल करण्यात आले, विश्व बँकेचा अहवाल प्रसिद्ध झाला, तेव्हा सरदार सरोवर प्रकल्पाला विरोध वाढला. आजही हजारो विस्थापितांची घरे वाचवण्यासाठी संघर्ष सुरू आहे. येत्या चार वर्षांत हा संघर्ष अधिक तीव्र होणार आहे.

NAPM संविधानिक हक्क आणि मानवाधिकार मानतो. तो निसर्गधर्म आणि मानवी धर्म हे दोनच खरे धर्म मानतो. आणि तो लोकशाही समाजवादावर आधारित आहे. सत्ताधारी पक्ष जे पक्ष पक्षी झाले आहेत, इकडून तिकडे उडत राहतात त्यांच्यासाठी हा मंच नाही. आपण वेगवेगळ्या चळवळींत काम करत असताना एकमेकांना आधार द्यायला हवा. युवा कार्यकर्त्यांची आणि महिलांची भूमिका यात खूप मोठी आहे. डिजिटलायझेशनच्या बाबतीत आम्ही एवढे तज्ज्ञ नाही, पण तरुणांनी योग्य दिशेने सोशल मीडियाचा वापर केला, तर तो खऱ्या अर्थाने 'सोशल' राहील, नाहीतर तो 'अँटी–सोशल' होईल.

खास वृत्तांत

NAPM शी संलग्न देशभरातील विविध जन आंदोलनांची वाटचाल संघर्ष, प्रतिकार आणि नव्या दिशांचा वेध

मीनल उत्तुरकर

देशभरात विविध जन संघटना, जन आंदोलने सातत्याने स्थानिक लोकांवर होणाऱ्या अन्याया विरुद्ध लढत असतात. NAPM शी संलग्न असलेल्या या आंदोलनांतून आणि सामाजिक चळवळींमधून समोर आलेल्या वास्तवांना समजून घेणे, संघर्षाच्या प्रक्रिया आणि पद्धतींवर विचार करणे, आणि लढ्याची पुढील दिशा ठरवणे; या अंगाने संमेलनात झालेल्या चर्चेचा हा गोषवारा. यात देशभरातून आलेल्या विविध कार्यकर्त्यांनी आपल्या लढयांच्या कथा व व्यथा कथन केल्या.

NAPM च्या राष्ट्रीय कृती गटाचे सदस्य आणि उदिशातील शेतकरी चळवळ आणि पर्यावरण रक्षणासाठीच्या चळवळीतील जेष्ठ समाजवादी कार्यकर्ते प्रफुल्ल सामंतरा यांनी या सत्राची अध्यक्षीय सुरुवात करताना NAPM च्या ३० वर्षांच्या संघर्षानंतर यापुढे लोकशक्ती मजबूत करण्यासाठी काय करावे या दिशेने चर्चा पुढे जावी, असे आवाहन केले. ते म्हणाले, आजच्या परिस्थितीकडे पाहिल्यास, आपल्या लोकशाहीवर मोठा धोका आहे. संविधान आहे, पण त्यालाही कमकुवत केले जात आहे. निवडणुका झाल्या तरी लोकशाही संपवत, हुकूमशाही चालवली जात आहे. राजकीय पक्षांच्या बाबतीत पाहिले तर भाजप आणि संघटन त्यांचा अजेंडा राबवत आहेत. दुसरीकडे, विरोधी पक्ष कधी भाजप–आरएसएसच्या विरोधात उभे राहतात, पण भांडवलशाहीच्या विरोधात ते काही करत नाहीत. आज मोठ्या कंपन्या आणि बाजारपेठा संपूर्ण व्यवस्था चालवत आहेत, बॉक्साइट, लोखंड, कोळसा, जंगल, पाणी यांच्या लुटीविरोधात लढणाऱ्या लोकांवर अत्याचार होतात, अनेक कार्यकर्ते अजूनही तुरुंगात आहेत. पण मुख्य कम्युनिस्ट पक्ष याविरोधात उघड भूमिका घेत नाहीत. आज परिस्थिती अशी आहे की सरकार, पोलिस आणि मोठे लोकसर्व कॉर्पोरेट कंपन्यांच्या ताब्यात जात आहेत. अशा वेळी सर्व डाव्या पक्षांनी एकत्र यायला हवे, पण काही पक्ष पूर्णत: सोबत येत नाहीत. त्यामुळे आपण या मुद्यांवर चर्चा करू.निसर्गसंपत्तीच्या लुटीविरोधात आणि खोट्या विकासाच्या विरोधात कसा आवाज उठवावा यावर आज विचार व्हायला हवा. या सत्राचे सूत्र संचालन दिल्लीच्या आरटीआय कार्यकर्त्या अंजली भारद्वाज यांनी केलं.

तामिळनाडू मधील मजूर हक्क आणि जमिनीच्या हक्कांसाठी संघर्ष

मजूर हक्क आणि संघर्ष या बद्दल तामिळनाडूच्या कॉ. गीता रामकृष्णन यांनी NAPM च्या माध्यमातुन जमिनीच्या हक्कांसाठी सार्वजनिक सुनावणी घेतली. तिथे ३६ समुदाय सहभागी झाले होते; त्यांपैकी १८ समुदाय चेन्नईतील होते तर उर्वरित १८ हे मुख्यत: आदिवासी आणि मीठ कामगार समुदाय होते. आज जमिनीच्या हक्कांचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण कॉर्पोरेट कंपन्या गरीबांची जमीन बळकावण्याचा प्रयत्न करत आहेत. आपण ठामपणे सांगितले पाहिजे की जमीन ही गरीब आणि श्रमिक वर्गासाठी आहे, आणि त्यांचाच तिला अधिकार असला पाहिजे. दिल्लीतील सरकार मनुस्मृतीच्या विचारांवर चालत आहे, जिथे श्रमिक वर्गाला आणि महिलांना संपत्तीच्या हक्कांपासून वंचित ठेवले जाते. म्हणूनच आपण ठाम भूमिका घेत सांगितले पाहिजे की श्रमिक वर्गालाच संपत्ती आणि जमिनीचे अधिकार असले पाहिजेत.

NAPM च्या नेतृत्वाखाली तमिळनाडूत असंगठित कामगारांच्या हक्कांसाठी अनेक दशकांपासून संघर्ष सुरू आहे. १९७९ मध्ये बांधकाम कामगारांच्या हक्कांसाठी लढा सुरू झाला, ज्यामुळे तमिळनाडू मॅन्युअल वर्कर्स कायदा अस्तित्वात आला. ३६ मजूर कल्याण मंडळे कार्यरत आहेत, ज्यामध्ये कृषी कामगार, मासेमारी कामगार, महसूल विभागाशी संबंधित कामगार यांचा

समावेश आहे. १९८५ ते १९९६ दरम्यान न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्ण यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर संघर्ष झाला आणि अखेरीस देशभरात मजूर कल्याण मंडळे स्थापन झाली.

मजूर हक्कांवर हल्ला लेबर कोडचे संकट

केंद्र सरकारने कोणत्याही सल्लामसलतीशिवाय नव्या श्रमसंहितांना मंजुरी दिली आहे. २०१४ पासून कामगार संघटनांशी कोणतीही चर्चा न करता सरकारने चार नवीन लेबर कोड लागू केले आहेत. तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या दोन राज्यांनीच या कायद्यांची अंमलबजावणी करण्यास नकार दिला आहे. नवीन कायद्यांमुळे बांधकाम मजुरांच्या सुरक्षिततेसाठी असलेले २०० नियम रद्द करण्यात आले आहेत. संपावर बंदी हाही मजुरांवरील हल्लाच आहे. नवीन कायद्यांनुसार, जर मजुरांनी संप पुकारला तर त्यांना त्वरित चर्चेसाठी बोलावले जाईल. आणि संप सुरू ठेवल्यास त्यांची नोकरी आणि ट्रेड युनियन नोंदणी रद्द केली जाईल. त्यामुळेच ऀझ्श च्या नेतृत्वाखाली या लेबर कोडच्या विरोधात संघर्ष उभा करणे अनिवार्य आहे.

NAPM तर्फे राज्य आणि देशव्यापी आंदोलनाची तयारी सुरू आहे. यात ३ ते १० मार्च – तमिळनाडू राज्यव्यापी निदर्शने, १५ ते १८ मार्च – पदयात्रा, १८ मार्च – चेन्नईमध्ये मोठी रॅली आणि २०–२१ मार्च – दिल्लीमध्ये आंदोलन आणि राष्ट्रीय अधिवेशन असे टप्पे ठरले आहेत. आज कृषी कामगार, मनरेगा मजूर, स्थलांतरित कामगार सर्वच अत्यंत वाईट परिस्थितीतून जात आहेत. मनरेगाचा निधी केंद्र सरकारकडून अडवला जात आहे, त्यामुळे मजुरांना योग्य रोजगार मिळत नाही. स्थलांतरित मजुरांची परिस्थिती अधिकच बिकट होत चालली आहे. NAPM च्या नेतृत्वाखाली सर्वांना एकत्र यावे लागेल!

जम्मू काश्मीर मधील कॉर्पोरेटायझेशनविरोधी लढा

जम्मू काश्मीर च्या डॉ. शेख रसूल यांनी तेथील संघर्ष आणि कॉर्पोरेटायझेशनविरोधी लढा याची माहिती दिली. त्यात त्यांनी जम्मू–काश्मीरमधील महत्त्वाचे संघर्ष आणि विजय कथन केले. जम्मू–काश्मीरमध्ये तीन मोठ्या सामाजिक चळवळी लढल्या गेल्या आहेत. आरटीआय चळवळ (माहितीच्या अधिकारासाठी लढा), तोस मैदान बचाव फ्रंट – इंडियन आर्मीच्या ४थ्या सर्वात मोठ्या फायरिंग रेंजला बंद पाडून १०,००० पेक्षा जास्त स्थलांतरित गटांना जमीन मिळवून देण्याचा मोठा विजय आणि फॉरेस्ट राइट्स कोअलिशन – आदिवासींच्या जमिनी आणि जंगलांवरील हक्कांसाठी सुरू असलेला संघर्ष! ही सर्व लढाई माहितीच्या अधिकाराच्या मदतीने लढवली गेली, पण आज तोच माहितीचा अधिकार (ंऊ्घ) धोक्यात आहे. त्यामुळे त्याच्या रक्षणासाठी लढा उभारण्याची तातडीची गरज आहे.

जम्मू काश्मीर मधील कलम ३७० हटवण्याचा खरा हेतू म्हणजे कॉर्पोरेटायझेशन आणि जमीन बळकावण्याचा कट आहे. ५ ऑगस्ट २०१९ रोजी केंद्र सरकारने जम्मू–काश्मीर आणि लडाखचे विशेष राज्याचा दर्जा रद्द करून केंद्रशासित प्रदेश बनवले. यामागे प्रचार वेगळा केला गेला, पण खरी कारणं वेगळीच आहेत: कॉर्पोरेट कंपन्यांना तिथे माइनिंग करायची होती, जमीन विकत घ्यायची होती. कलम ३७० मध्ये 'लँड प्रोटेक्शन' आणि 'माउंटन प्रोटेक्शन' सारखी संरक्षणात्मक तरतुदी होत्या, त्यांना संपवण्यासाठीच हा निर्णय घेतला गेला. निवडणुका झाल्या तरी लँड आणि लॉ या विषयांवरील अधिकार अजूनही दिल्लीच्या सरकारकडेच आहेत. कॉर्पोरेटायझेशनविरोधी राष्ट्रीय लढ्याची आता गरज आहे. आपण सर्वजण कॉर्पोरेटायझेशन आणि कॉर्पोरेटांच्या लूटीसाठीच लढत आहोत. म्हणूनच, हा संघर्ष केवळ स्थानिक राहू शकत नाही, तर संपूर्ण भारतभर याविरुद्ध एक संघटित लढा उभा करावा लागेल.

फॉरेस्ट राइट्स (वन हक्क) कायद्याचा फसवणूक करणारे अंमलबजावणी धोरण केंद्र सरकारने आणले आहे. केंद्र सरकारने सांगितले की, फॉरेस्ट राइट्स कायदा २००६ लागू केला जाईल, पण तो अजूनही प्रत्यक्षात लागू झालेला नाही. ३० पेक्षा जास्त ग्रामसभांनी १०,००० चौरस किमी जंगल क्षेत्रावर आपला हक्क जाहीर केला आहे पण आजपर्यंत त्यांना त्या जमिनीचे कोणतेही पट्टे देण्यात आलेले नाहीत.

आता UAPA (अनलॉफुल अ‍ॅक्टिव्हिटीज प्रिव्हेन्शन अ‍ॅक्ट) आणि PSA (पब्लिक सेफ्टी अ‍ॅक्ट) अशा कठोर कायद्यांचा वापर करून स्थानिक जनतेच्या हक्कांना विरोध केला जात आहे: हे सर्व कायदे लोकांच्या लढ्यांना दडपण्यासाठी वापरले जात आहेत, त्यामुळे त्यांना रद्द करणे अत्यावश्यक आहे.

टुरिझमच्या नावाखाली लोकांचे रोजगार आणि

पर्यावरणाचा नाश होतो आहे. सरकार सांगते की, काश्मीरमध्ये फक्त टुरिझमवर अर्थव्यवस्था अवलंबून आहे, पण ही चुकीची माहिती आहे. काश्मीरमध्ये ८२३ रोजगार शेती आणि कृषी प्रक्रियांमध्ये आहे, १०३ रोजगार पशुपालन, मासेमारी आणि शेतीपूरक व्यवसायात आहे, मात्र, सरकार ६३ टुरिझमसाठी संपूर्ण ९२३ लोकांचे पारंपरिक रोजगार धोक्यात घालत आहे. आम्हाला अशा प्रकारच्या पर्यटनाची गरज नाही, जिथे: आपले डोंगर उद्ध्वस्त होतील, पाण्याचे स्रोत दूषित होतील, संस्कृतीवर आक्रमण होईल.

उत्तराखंडातील पर्यावरण वाचवण्याचा आणि महिलांच्या हक्कांसाठी लढा

उत्तराखंडच्या चंद्रकला यांनी तेथील पर्यावरण वाचवण्यासाठी आणि महिलांच्या हक्कासाठी चालू असलेल्या लढ्यांची माहिती दिली. संघर्ष हा आपल्याला लढायला शिकवतो आणि लढा आपल्याला संघर्ष करायला शिकवतो. संघर्षाशिवाय काहीही मिळत नाही. मी उत्तराखंडच्या डोंगराळ प्रदेशातून आले आहे, जिथे हिमालय आहे, जिथे नद्या आहेत, जिथे जंगलं आहेत. तिथे हिमालय आणि पर्यावरणाची लूट चालू आहे. हा संघर्ष फक्त आजचा नाही. सरकारं असोत किंवा भांडवलदार असोत, त्यांनी नेहमीच डोंगर, नद्या आणि जंगलं लुटली आहेत. आदिवासी आणि स्थानिक लोकांनी सदैव पर्यावरणाचं रक्षण केलं, पण त्यांना नेहमीच हद्दपार करण्यात आलं. पूर्वी फक्त लूट होत होती, पण आज परिस्थिती अधिक गंभीर आणि हिंसक बनली आहे. आजचा संघर्ष अधिक कठीण आणि तीव्र आहे, म्हणूनच आपल्याला आपल्या विचारसरणीलाही अधिक तीव्र करावं लागेल.

महिला हक्क आणि उत्तराखंड महिला मंच अर्थात उत्तराखंड महिला मंच १९९४ पासून लढा देत आहे, जेव्हा उत्तराखंड वेगळं राज्य झालं. मुजफ्फरनगर कांड – जेव्हा उत्तराखंडच्या लढ्यात महिला आंदोलनकर्त्यांवर बलात्कार आणि हत्याकांड घडलं, पण महिला मंच लढत राहिला. आजही महिला मंच UCC विरोधात लढत आहे. मद्य आणि ड्रग्सच्या व्यसनाविरोधातही संघर्ष करत आहे, कारण यामुळे तरुणाई उद्ध्वस्त होत आहे. उत्तराखंडमध्ये टुरिझम आणि महिलांवरील अत्याचार वाढत आहेत. सरकार उत्तराखंडला पर्यटनाचं केंद्र बनवत आहे, पण यामुळे महिलांवरील अत्याचार वाढले आहेत. अंकिता हत्या प्रकरण – भाजपा मंत्र्याच्या मुलाने एका तरुणीची हत्या केली, पण आजपर्यंत न्याय मिळालेला नाही. महिला मंच कोर्टात लढत आहे, पण CBI चौकशीही मंजूर केली जात नाही.

उत्तराखंडवर संघ–भाजपचा हल्ला

पूर्वी उत्तराखंडची ओळख नद्यांचा उगमस्थान, हिमनदींचं माहेरघर आणि गंगा–यमुना संस्कृतीचं केंद्र अशी होती. पण आता त्याचा नाश केला जात आहे. उत्तराखंडला हिंदुत्ववादी प्रयोगशाळा बनवलं जात आहे. २०१८ मध्ये धर्मांतर विरोधी कायदा आणला गेला. समान नागरी संहिता (UCC) थोपवली गेली, जी संघवादी मानसिकतेला बळकटी देण्याचा डाव आहे. भाजपचं हिंदुत्ववादी राजकारण आणि महिलांचे अधिकार: उत्तराखंडला हिंदुत्वाच्या नावाखाली अशांत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मुळात प्रश्न हिंदुत्वाचा नाही, तर महिलांवरील अन्याय आणि पितृसत्ताक व्यवस्थेचा आहे. महिलांना गप्प बसवण्याचा प्रयत्न सुरू आहे, त्यांना परत घरात डांबण्याचं कटकारस्थान रचलं जात आहे. महिलांचं अस्तित्वच नष्ट करण्याचं हे राजकारण आहे, पण महिला मंच असं होऊ देणार नाही! महिला समानता ही समाजाच्या अस्तित्वासाठी गरजेची आहे: जर स्त्रिया नसतील, तर समाजही नसेल कुठल्याही फॅसिस्ट, पितृसत्ताक, धर्मांध विचारसरणीला महिलांना घरात कोंडता येणार नाही! आभाळातील अर्धे तारे नसतील, तर आभाळच अपूर्ण होईल! ही महिलांची आणि पुरुषांची समान लढाई आहे, आणि ही लढाई आपण पुढे नेत राहू!

उदिशामधील आदिवासींच्या हक्कांसाठी आंदोलन

उदिशाचे जेष्ठ समाजवादी कार्यकर्ते आणि वन हक्क लढ्यात सक्रीय असलेले लिंगराज आझाद यानी आंदोलनाच्या प्रक्रियेचे विश्लेषण करत सांगीतले की आजच्या काळात "जनतेची राजकीय ताकद" (पीपल्स पॉलिटिक्स) नसल्यास देशाचे विनाश होण्यापासून कोणीही वाचवू शकत नाही. म्हणूनच एनएपीएमची स्थापना गरजेची होती. आंदोलन आपल्याला ब्रयाच गोष्टी शिकवते. भाषणांमधून विचार स्पष्ट होऊ शकतो, पण प्रत्यक्ष कृतीतून आपल्याला खरी जाणीव आणि संस्कार मिळतात. आपल्या चळवळीतील प्रत्येक कार्यकर्ता तो मोठा नेता असो किंवा एक सामान्य कार्यकर्ता या मूल्यांना धरून चालतो. त्यामुळेच आजच्या ३० वर्षांच्या लढाईचा संकल्प आपण अधिक बळकट केला पाहिजे.

आंदोलन केवळ चालवायचं नसतं, तर त्याच्या विजयाचं रक्षण करायचं असतं. आपण अनेक आंदोलनं जिंकली आहेत, पण त्या विजयांना टिकवणं आपल्या जबाबदारीत येतं. आज लोकशाही नष्ट होत आहे. सध्या देशात खया अर्थाने लोकशाही नाही, तर भांडवलशाही आणि कॉर्पोरेटशाही सुरू आहे. हे तंत्र बंद करण्यासाठी आपण पुन्हा संकल्प करायला हवा. ओडिशाच्या संदर्भात सांगायचं झाल्यास, राहुल गांधी यांनी आदिवासींच्या समर्थनाची भाषा केली, पण ओडिशातच काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वाने कंपन्यांच्या बाजूने रॅली काढली. हे स्पष्ट दाखवते की राजकीय पक्षांची भूमिका काय आहे. त्यामुळे कोणत्या राजकीय पक्षाला पाठिंबा द्यायचा आणि कोणाला विरोध करायचा हे समजून घेतलं पाहिजे.

आज सरकारच्या दडपशाहीचं प्रमाण इतकं वाढलं आहे की एकदा कोणी तुरुंगात गेलं की त्याला सहज जामीन मिळत नाही. ओडिशातील आमच्या चार सहकाऱ्यांना मुख्यमंत्री कार्यालयात मागणीपत्र द्यायला जात असताना अटक करण्यात आली. एक खटला संपला की लगेच दुसरा खटला दाखल केला जातो. अशा प्रकारे एकामागोमाग एक गुन्हे लावून त्यांना वर्षानुवर्षे तुरुंगात ठेवण्यात येत आहे. ही फक्त आमच्या राज्यापुरती मर्यादित बाब नाही, तर संपूर्ण देशात हीच परिस्थिती आहे.

आपल्या आंदोलनांचं स्वरूपही आपण समजून घेतलं पाहिजे. जर आपण केवळ "मुद्दा–आधारित" आंदोलन करत राहिलो आणि "व्यवस्था–आधारित" संघर्ष केला नाही, तर आपण सतत फसवले जाऊ. जेव्हा आंदोलनासाठी मोर्चे निघतात, तेव्हा हजारो लोक सहभागी होतात, पण निवडणुकीच्या वेळी हेच लोक ज्या सत्ताधाऱ्यांनी त्यांना दडपलं, त्यांच्याच बाजूने मतदान करतात. अशा परिस्थितीत आपण बदल घडवू शकणार नाही. आपण कॉर्पोरेट्स आणि सरकारविरोधात लढतो, पण आपल्याला काही वेळा स्वत:च्या आंदोलनकारांशीही संघर्ष करावा लागतो. काही तथाकथित 9रेडिकल9 गट आपल्याला कमकुवत करण्याचा प्रयत्न करतात. पण आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बुद्ध यांच्या विचारांवर विश्वास ठेवतो आणि संघर्ष करतो.

झारखंड मधील आदिवासींचे जीवन उध्वस्त करणाऱ्या खाणींच्या प्रकल्पांविरुद्ध लढा

झारखंडच्या आदिवासींच्या हक्कासाठी लढणाऱ्या एलिना होरो यांनी लढ्याची माहिती विशद करताना सांगीतलं, झारखंड नेहमीच आंदोलनांचे केंद्र राहिले आहे. जल, जंगल, जमीन यांच्या हक्कांसाठी येथे अनेक संघर्ष झाले आहेत, काही यशस्वी झाले, तर काही अजूनही सुरूच आहेत. या संघर्षांमधून आपण बरेच काही शिकू शकतो. विशेषत: कोळसा खाणविरोधी संघर्षात लोकांनी मोठी भूमिका बजावली आणि प्रकल्प रोखण्यात यश मिळवले. तसेच स्थानिक नेतृत्वाखालील आंदोलनांमुळे काही ठिकाणी सरकारला अधिसूचना काढण्यासही रोखले गेले. अशाच प्रकारे अनेक आंदोलनं अजूनही सुरू आहेत.

पत्थलगडी आंदोलन हे स्थानिक स्वायत्ततेच्या अधिकारांसाठी मोठा लढा होता. आदिवासी, दलित आणि इतर वंचित समुदायांवरील राजकीय दडपशाही कायमच राहिली आहे. महासभा या सर्व अत्याचारांविरोधात संघर्ष करत आली आहे. विशेषत: माओवादी चळवळ आणि सरकारी दडपशाहीच्या कचाट्यात आदिवासी सापडत आहेत. अनेक निष्पाप लोकांना खोट्या केसमध्ये अडकवून तुरुंगात टाकले जात आहे. त्यांची सुटका करण्यासाठी आम्ही सतत प्रयत्न करत आहोत, परंतु हा संघर्ष अजूनही सुरू आहे. सध्या महासभा पंचायत राज कायदा आणि पेशा कायदा अधिक प्रभावी करण्यासाठी आंदोलन करत आहे. राज्यातील आदिवासी स्वायत्तता अधिक बळकट करण्यासाठी हे महत्त्वाचे आहे. याशिवाय, लोकशाही वाचवण्यासाठी गेल्या दोन वर्षांत आम्ही मोठ्या प्रमाणात राजकीय हस्तक्षेप केला आहे. विशेषत: झारखंडमधून भाजपला हटवण्याच्या आंदोलनात महासभेने महत्त्वाची भूमिका बजावली. "भाजपा हटवा, मोदी हटवा" हा घोषणा देऊन आम्ही काम केले आणि २००४ नंतर पहिल्यांदाच झारखंडमधील अनुसूचित क्षेत्रांमध्ये भाजपचा पराभव झाला. ही खूप मोठी उपलब्धी आहे.

तथापि, आदिवासी हक्कांसाठी व्यापक आणि एकसंध लढ्याची गरज अजूनही आहे. छत्तीसगड, ओडिशा आणि इतर भागांमध्ये आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाला विरोध करण्यासाठी मोठ्या चळवळी उभारण्याची गरज आहे. अनेकदा आम्ही लढतो, पण तेवढ्या प्रभावीपणे नाही, जितकी गरज आहे. त्यामुळे एनएपीएममधील सर्व कार्यकर्त्यांनी यावर विचार करावा, एकत्र येऊन मोठा आणि बळकट लढा उभा करावा.

नर्मदा बचाव आंदोलनामध्ये विस्थापितांच्या पुनर्वसनाचा लढा

नर्मदा बचाव आंदोलन आणि जमिनीसाठीचा संघर्ष या बद्दल माहिती देताना नर्मदा बचाव आंदोलनाच्या लतिका राजपूत यांनी विस्थापितांच्या पुनर्वसनाच्या लढ्याची कहाणी सांगितली. त्यांनी सांगितले की हजारो लोकांना आपल्या जमिनी गमवाव्या लागल्या होत्या, त्यांच्या हक्कासाठी त्यांनी कित्येक दशके संघर्ष केला. कोर्टाच्या निकालांनी आणि सातत्याने चाललेल्या लोकचळवळींमुळे, अनेकांना त्यांची जमीन परत मिळाली. त्यांचा महत्त्वाचा मुद्दा होता – लोकांनी जर एकत्र येऊन संघर्ष केला तर भांडवलशाही आणि राज्यसत्तेच्या अन्यायाला तोंड देणे शक्य आहे. सरकार विकासाच्या नावाखाली लोकांना विस्थापित करते, मात्र त्यांना पुनर्वसन देत नाही. हा अन्याय थांबवण्यासाठी तळागाळातील संघटनांनी अधिक सक्षमपणे काम करण्याची गरज आहे.

गुजरात मधील नागरी समाज संघटनांवरील वाढती दडपशाही

गुजरातमधील सामाजिक कार्यकर्ते प्रसाद चाको यांनी नागरी समाज संघटित करण्यास येणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकला. त्यांनी स्पष्ट केले की सध्याच्या काळात सरकारच्या धोरणांवर टीका करणाऱ्या चळवळींना लक्ष्य केले जाते. कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करणे, आंदोलने चिरडणे, आणि नागरी हक्कांवर गदा आणणे हे प्रकार वाढत चालले आहेत. त्यांनी गुजरातमध्ये झालेल्या अनेक घटनांचा संदर्भ देऊन सांगितले की लोकशाहीविरोधी धोरणे आणून, प्रशासन लोकआंदोलनांना गुन्हेगारीकरणाचे स्वरूप देत आहे. हे रोखण्यासाठी नागरी समाजाला अधिक सशक्त होऊन एकत्र लढण्याची गरज आहे.

छत्तीसगड मधील हसदेव जंगल आणि आदिवासींचा खाण कंपन्यांविरोधी लढा

छत्तीसगडमधील आदिवासी कार्यकर्ते श्यामलाल करियाम यांनी हसदेव जंगल परिसरातील आदिवासी प्रतिकाराची कहाणी मांडली. या जंगलावर मोठ्या खाण कंपन्यांची नजर आहे. सरकारने त्यांना खाणींच्या उत्खननासाठी परवानगी दिली, पण स्थानिक आदिवासी लोकांनी या जंगलाच्या रक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर लढा उभारला आहे. त्यांच्या मते, ही लढाई केवळ पर्यावरण बचावासाठी नाही तर संपूर्ण आदिवासी संस्कृती आणि जीवनशैलीच्या अस्तित्वासाठी आहे. जर हे जंगल नष्ट झाले, तर त्यांच्या पारंपरिक उपजीविकेच्या साधनांवर मोठा परिणाम होईल. त्यांनी सांगितले की, स्थानिकांनी खाणींना विरोध करत ग्रामसभा स्तरावर मोठ्या प्रमाणावर जागृती मोहीम राबवली आहे, आणि त्यामुळेच कॉर्पोरेट कंपन्यांना अद्याप त्यांचे काम सुरू करता आले नाही.

ट्रान्स (पारलिंगी) समुदायाचा लढा: जाती, लिंग आणि भेदभावाविरुद्ध संघर्ष

भोपाळच्या पारलिंगी कार्यकर्त्या मुस्कान यांनी ट्रान्स समुदायाच्या विविध स्तरांवरील संघर्षांविषयी चर्चा केली. ट्रान्स समुदायाला केवळ लिंगभेदच नव्हे, तर जात, आर्थिक शोषण, आणि समाजाच्या संरचनात्मक भेदभावाचा सामना करावा लागतो. त्यांनी सांगितले की, नोकऱ्या, शिक्षण, घरभाडे, आरोग्यसेवा – या सर्व ठिकाणी ट्रान्स लोकांना भेदभावाचा सामना करावा लागतो. विशेषत: खेड्यापाड्यात आणि छोट्या शहरांमध्ये ट्रान्स लोकांवर होणाऱ्या अत्याचारांमध्ये वाढ होत आहे. त्यांनी काही ठळक उदाहरणेही दिली, जिथे ट्रान्स समुदायाने एकत्र येऊन विरोध केला आणि काही ठिकाणी स्थानिक प्रशासनालाही झुकावे लागले. त्यांच्या मते, संविधानाने दिलेले हक्क कागदावर आहेत, पण त्यांची अंमलबजावणी होण्यासाठी आणखी संघर्ष करावा लागणार आहे.

स्त्रियांवरील अन्याय आणि एनकाउंटर न्यायाचा फसवा दिखावा विषाद करतांना दिशा बलात्कार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मुस्कान यांनी आणखी एका गंभीर विषयाकडे लक्ष वेधले महिलांवरील हिंसाचार, सरकारचा दिखाव्याचा न्याय आणि पोलिसांच्या एनकाउंटर पद्धती. २०१९ मध्ये तेलंगणात घडलेल्या दिशा बलात्कार प्रकरणात, पोलिसांनी चार संशयितांना कथितरित्या एनकाउंटरमध्ये ठार मारले. हा प्रकार स्त्रियांच्या सुरक्षेसाठी योग्य उपाय आहे की लोकशाहीच्या प्रक्रियेचा बळी आहे? मुस्कान आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या एनकाउंटर विरोधात न्यायालयात याचिका दाखल केली आणि या प्रकाराला "न्यायाच्या नावाखाली अन्याय" असे संबोधले. त्यांनी सांगितले की, स्त्रियांना सुरक्षित वाटण्यासाठी तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी मूलभूत बदल गरजेचे आहेत, जसे की पोलिस सुधारणा, लैंगिक शिक्षण, आणि महिलांसाठी स्वतंत्र व कार्यक्षम न्याययंत्रणा.

सत्राचा समारोप करताना अंजली भारद्वाज यांनी स्पष्ट

केले की, या सत्रात देशभरातील अन्याय अत्याचार आणि त्या विरुद्ध लोकांनी पुकारलेला एल्गार याचा केवळ काही हिस्साच सांगितला जावू शकला आहे. विकासाच्या विनाशकारी आक्रमणापुढे शरणागती न पत्करता संघटितपणे आणि संवैधानिक पद्धतीने लढणारे असंख्य लधे आणि वाईकल्पिक निर्माण कार्य या सत्रात बांधता आलेले नाही. मात्र शितावरून भाताची परीक्षा या न्यायाने या सत्रात NAPM च्या व्यापक वाटचालीची एक झलक मिळू शकली आहे. यातून पुढे जाण्याची दिशाही व्यक्त झाली आहे. लडेंगे – जितेंगे हा निर्धारही व्यक्त झाला आहे.

(युवा मन: पान ९ वरुन)

विरोधात लढा उभा केला जातो. तेव्हा लढा उभा करणाऱ्या कार्यकर्त्यांना भीती घातली जाते, फोडण्याचा प्रयत्न केला जातो. लीलाबाई सारख्या एका आदिवासी महिला कार्यकर्त्याचे घर जाळले जाते. फक्त अंगावरच्या कपड्यांनीशी त्या बाहेर पडतात. पण तरीही त्या मंचावरन गातात 'आज नाही उद्याला मरायचं, मग कशाला मागं सरायचं!' खोदकामासाठी येणाऱ्या जेसीबी समोर लीलाबाई मरगळे जेव्हा स्वत:ला झोकून देतात आणि असेल हिम्मत तर ने माझ्यावरून, असे ठणकावून सांगतात. आणि एवढं सगळं आयुष्याच दुखणं घडून देखील हा लढा मागे घेण्याचा साधा विचारही ह्या अशिक्षित बाईच्या मनात येत नाही. हा आदर्श माझ्यासारख्यांनी घ्यायला हवा असं मला वाटतं. आज लवासा प्रकल्प बंद आहे. लढा सोडून गेलेले, भीतीपोटी घाबरून गेलेले अनेक कार्यकर्ते पुन्हा लवासामध्ये एकत्र जमत आहेत. पुन्हा लढा उभारला जातो आहे. कारण लढाई अजून संपलेली नाही. या अशा राष्ट्रीय मंचावरून जेव्हा जलसार टेंभीखोडावे येथील दगड खाणी संदर्भातला मुद्दा तसेच बोगद्यासाठी करण्यात येणाऱ्या भूसुरुंगाच्या स्फोटा संदर्भातील विषय उभारला वरून आमची पाठ थोपटली जाते आणि या आंदोलनात एन ए पी एम सर्व ताकतीनिशी तुमच्या पाठीशी उभी आहे याची शाश्वती दिली जाते. तेव्हा आम्ही त्या जागी उपस्थित असलेले सर्व कार्यकर्ते दुप्पट जोमाने काम करू, असे मत व्यक्त करतो.

विकासाची परिभाषा आज बदलून गेली आहे. विकास म्हणजे केवळ विषमता, विभाजन आणि विनाश एवढाच राहिला आहे, असे मत मेधाताई मांडतात तेव्हा सहाजिकच आपल्या आजूबाजूला घडणारा विकास नेमका कसल्या प्रकारचा आहे, हे तपासून घेणे ही प्रत्येकांची जबाबदारी आहे. 'प्रकृती को बचाना है तो संस्कृती को भी बचाना होगा' असे म्हणत आदिवासींच्या निसर्ग पूजकतेचा स्वीकार करायला हवा, या गोष्टीकडे देखील त्या लक्ष वेधू इच्छितात. लोकशाही आणि जन आंदोलने, संघर्ष आणि पर्याय यांची चांगली देवाण–घेवाण झाली तरच भारताचे ऐक्य टिकून राहील! शेवटी या सगळ्या आयोजनातून काय शिकायला मिळाले तर ते हेच की १४० कोटीच्या देशातून आपण फक्त एक गर्दी म्हणून समोर न येता निर्माण होणाऱ्या अडचणी, न्याय्य हक्काला येणारी बाधा, सामाजिक ऐक्याला जाणारा तडा आणि विनाशकारी विकास या विरोधातली एक आंदोलनात्मक वज्रमुठ म्हणून पुढे येणे गरजेचे आहे. असंविधानिक, अनैसर्गिक विषयांकडे प्रदेशनिहाय वेगवेगळे पाहणे धोक्याचे ठरेल. एकत्रितपणे जर हा लढा लढलो तर संघर्षांती यश मिळवणे कठीण नाही. लढेंगे जीतेंगे| लढे है जीते है|

(लेखक पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाजोन्नती सेवा संस्थेचा कार्यकर्ता असून शिल्पकला, चित्रकला यात निपूण आहे जिल्ह्यातील पाड्या पाड्यात जाऊन पर्यावरणीय व सामाजिक जाणीवा विकसित करण्यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो.)

9764606415

'आंदोलन'ची वर्गणी भरा व
जनचळवळीस सहयोग करा!

आंदोलन अंकाचे सर्व लेखक, अनुवादक, मुखपृष्ठ व टाईप सेटींग करणारे युवा सहकारी असे सर्वजण आंदोलन साठीची जबाबदारी, विनामोबदला पार पाडतात! आंदोलन टीम त्यांचे प्रती कृतज्ञ आहे!

छपाई, टपाल व अनुषांगिक खर्च मात्र वाढत आहेत. त्या खर्चाची मिळवली करायची तर वर्गणी, देणगी व जाहिराती हाच आपला आधार! आपणही यातला भार उचला व आंदोलन चळवळीस हातभार लावा!!

वर्गणीचे व ती भरण्याबाबतचे सर्व तपशील याच अंकात पान २ वर दिलेले आहेत!

- शरद जोशी, व्यवस्थापक

ठराव

हैद्राबाद येथील एन ए पी एम @ 30 संमेलनात पारीत झालेले ठराव

सुहास कोल्हेकर

संमेलनातल्या गटचर्चा, सहभागी संघटना– आंदोलनाच्या प्रमुख मागण्या आदी मिळून एकूण ३८ ठराव संमेलनात ४ दिवसांच्या चर्चेतून पारीत करण्यात आले. ते १२ विषयात विभागून त्या त्या विषयानुसार येथे एकत्रितपणे देण्यात आले आहेत.

1.जलवायु परिवर्तन–पर्यावरणीय संकट

पर्यावरणाचे नुकसान करणारे सर्व प्रकल्प जसे वेस्ट डंपिंग ने उर्जा, प्रदुषणकारी उद्योग, हरीयाणामधील 10,000 ऐकर वरील सफारी, तातडीने बंद करण्यांत यावेत.

राजस्थानातील अरवली पर्वतरागांचा पूर्ण 692 किमीटरचा परिसर पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील म्हणून घोषित करावा. मानवी वसाहतींच्या व वन्यजीवांसाठीच्या संवेदनशील क्षेत्रांना नुकसान करणारे सर्व बेकायदेशीर व कायदेशीर खनन प्रकल्प बंद करण्यांत यावेत.

केरळ मध्ये सी आर झेड नोटीफिकेशन, मायनिंग कायदा, कोस्टल प्रोटेक्शन कायदा, या सर्वांचे उल्लंघन करुन व ई आय ए म्हणजे पर्यावरणीय प्रभावांचा अभ्यासही न करता सुरु असलेले थालापल्ली किना–यावरील अलापुझा वाळू खनन तातडीने बंद करण्यात यावे.

केरळमध्ये व अन्यत्र खाजगी कम्पन्यांशी संगनमत करुन डिजास्टर मॅनेजमेंट कायद्याचा दुरुपयोग करत, दुर्मिळ खनिजे काढण्याच्या विनाशकारी कामाचा विरोध करणा–यांना समन्वय समर्थन जाहीर करतो.

काश्मिरचा परिसर पर्यावरणीय दृष्टीने संवेदनशील आहे. तिथे स्थनिक प्रशासनाला कमजोर करुन पर्यटन व अन्य नफाखोरीचे उद्योग न आणता स्थानिकांना पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्याकरता सक्षम वनवावे. अशा प्रयत्नांना प्रोत्साहन दिले जावे अशी समन्वयाची मागणी आहे.

सध्याचे वाढते तपमान,अवकाळी मुसळधार पाऊस,समुद्राच्या पातळीत वाढ , वादळ,पूर अशा विविध संकटांना आपण सामोरे जातो आहोत.हे जलवायु परिवर्तनाचे परिणाम आहेत.अशा पर्यावरणीय संकटाचे मूळ हे सध्याच्या विकासाच्या नावाने सुरु असलेल्या विनाशांत आहे.मात्र यामुळे सर्वाधिक नुकसान होणार ते वंचित,गरीब कामगार व पारंपारिक वन निवासी व मच्छिमार या सारख्या नैसर्गिक संसाधनांवर उपजिविका करणा–या समुहांचे.जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय असा आग्रह करतो की, क्लायमेट क्रायसिस मुळे प्रभावित पारिवारांना व्हीक्टीमस– अशा संकटाचे बळी– मानले जावे व त्यांचे अन्य प्रकल्पग्रस्त विस्थापितां प्रमाणे संपूर्ण पुनर्वसन करण्याची सरकारने जबाबदारी घ्यावी.त्यांना तात्काळ सर्व वैद्यकिय मदत, पर्यायी निवारा व रोजगार उपल्ब्ध करुन दिला जावा.रोजगाराची सोय होईपर्यंत उदरनिर्वाह भत्ता दिला जावा.यादृष्टीने गरजेचे धोरणात्मक निर्णय घेतले जावेत या करिता समन्वय प्रयत्नशील राहील.

2. कामगारांचे हक्क

समन्वय म्हणून आपण आग्रह करतो की, सन 2014 च्या प्रोटेक्शन ऑफ लाईव्हलीहूडस् अँड रेग्युलेशन ऑफ स्ट्रीट व्हेंडिंग, कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यांत यावी. सर्व बेकायदेशीर कारवाया व जबरदस्तीने हटविणे ताबडतोब थोपवले जावे.

पथारीवाल्यांचे सर्वेक्षण करुन त्यांना परवाने दिले जावेत. टाऊन व्हेंडिंग समितिला सर्व्हेचे व कायदा पाळल्या जातो आहे का, यावर निगराणी करण्याचे अधिकार दिले जावेत.

सर्व पथारीवाल्यांना केंद्रीय व राज्य सरकारच्या सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ दिल्या जावा. व्यवसायाची परवानगी असलेल्या ठिकाणी त्यांना जवळ पिण्याच्या पाण्याची व शौचालयाची व्यवस्था, आरोग्य तपासणी शिबिरे अशा सर्व सुविधा पुरविल्या जाव्यात. व्यवसाय करण्याची परवानगी असलेल्या व नसलेल्या, क्षेत्रांचे स्पष्ट उल्लेख केलेले असावेत. विशेष बाजार जसे फूड हब्ज, हेरिटेज मार्केट, नाईट मार्केट, पुस्तक बाजार,

महिला बाजार विकसित करण्यांत यावेत.

हैद्राबाद महानगर म्युनसिपल कार्पोरेशनने कचरा वेचकांना अत्यावश्यक सेवेतील कामगार मानून ओळख पत्र द्यावीत. किमान वेतन रु.250 प्रति कुटुंब निश्चित करावे व पारदर्शतेच्या दृष्टीने डिजिटल पध्दतीने रक्कम थेट खात्यांत जमा करण्यांत यावी. त्यांना स्वयंरोजगार असा दर्जा असतो याबद्दल त्यांना जागृत करावे. शिवाय आरोग्य,अपघात व जीवन विमा, योग्य निवारा व रु 25.000 वार्षिक वाहन देखभाल भत्ता दिला जावा. कचरावेचकांना सन्मान व योग्य उत्पन्न मिळावे याकरिता सरकारच्या मदतीने कोऑपरेटीव्ह स्थापन कराव्यांत आणि व्यापारी कम्पन्यानी कचरा व्यवस्थापनाचा ताबा घेणे तात्काळ थाबविले जावे अशी समन्वयाची मागणी आहे.

देशभरातील कंत्राटी ,असंघटीत कचरा वेचकांचे सर्वेक्षण करुन त्यांना मान्यता देण्यांत यावी, त्यांना आवश्यक साधने देऊन त्यांना कचरा व्यवस्थापन यंत्रणेत सामावून घेतले जावे यासाठी आम्ही आग्रही राहूं.

स्वातंत्र्याचा अमृत मोहत्सव सरकार साजरा करत असतांना कुठेना कुठे सफाई कामगार टाकी साफ करतांना मेले, अशा बातम्या येतात. सरकारचा आम्ही धिक्कार करतो. खरंतर यांत्रिकि पध्दतीनेच मैला सफाई करायला हवी. सन् 2013 च्या म्यानुअल स्कैवेंजिंग प्रतिबंध व पुनर्वसन कायद्याची सर्वत्र काटेकोर अंमलबजावणी करण्यांत यावी व प्रभावित कुटुंबांचे कायदेशीर पुनर्वसन सुनिश्चित केले जावे, नुकसान भरपाई दिली जावी असा आमचा आग्रह आहे. सफाई कामगारांना आवश्यक यंत्र सामुग्री देऊन त्याच्या वापराचे प्रशिक्षण दिले जावे.

महाराष्ट्रातील समन्वयाशी संलग्न, श्रमिक जनता दलाला सलाम. त्यांनी केस लढविल्यामुळे राज्यस्तरीय देखरेख समिती गठित करण्यात आली. दर सहा महिन्यांनी परिस्थितीचा आढावा घेण्याचे आदेस कोर्टाने या समितीला दिले आहेत. देशभरातील सफाई कामगारांसोबत समन्वय सतत उभा आहे व त्यांचे लढे समन्वयाशी जोडलेले आहेत.

समन्वय केरळ व कर्नाटकातील आशा कामगारांच्या लढ्याला सलाम करतो.देशभरातील आशांना केंद्र सरकारकडून संवेदनशील प्रतिसाद व वेळेवर वेतन न दिल्याजाण्याचा धिक्कार करतो.

समन्वय आग्रह करतो की, राज्या सरकारांनी पुढाकार घेऊन आशांना वेतन वाढ, योग्य मोबदला न देता वाढीव कामे न वाढविणे, नियमितपणे दर महिन्याच्या दि.5 ला, कोणतीही काटछाट न करता मानधन मिळणे, मनमानी पध्दतीने काढून न टाकणे, निवृत्ती लाभ म्हणून रु.पाच लाख दिले जाणे या सर्व न्याय्य मागण्या मान्य कराव्यांत.

सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी नर्सेस, डॉक्टर्स व मदतनीस, आरोग्यकेंद्रातील सफाई कर्मचारी या सर्वांचे कंत्राटीकरण बंद करुन दीर्घकाळ चांगली सेवा दिलेल्यांना नियमित नेमणूका करतांना प्रधान्य दिले जावे, जिल्हा रुग्णालयांचे खाजगीकरण करण्याचे बंद करावे, आरोग्य कर्मचा–यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी त्यांच्या कामाच्या ठिकाणी सर्व आवश्यक सोयीसुविधा व सुरक्षितता मिळेल याची निश्चिती करावी. यासाठीचे आर्थिक नियोजन येत्या अर्थसंकल्पांत पुरवणी मागण्या म्हणून केले जावे.

3. शेती व शेतीसंबंधित......

सर्व राज्यांमध्ये भाडे तत्वावर शेती करणा–या शेतक–यांना हुडकून काढून त्यांना अधिकृत शेतकरी म्हणून मान्यता देण्यांत यावी. त्यांना भूधारक शेतक–यांना मिळतात ते सर्व लाभ, जसे सबसिडि, क्रेडिट व समाजकल्याण योजनांचा लाभ मिळायला हवेत. आर्थिक सुरक्षितता व आधाराची निश्चिती मिळावी म्हणून पी एम किसान योजनेचा विस्तार करुन त्याना सहभागी करुन घेण्यांत यावे.

अचूक नोंदी व्हाव्यांत म्हणून एफ आय आर च्या आधारे नोंदी करण्याचे धोरण राज्यभर आमलांत आणले जावे व शेतकरी आत्महत्या ओळखण्यांत याव्यांत. आत्महत्याग्रस्त शेतक–यांच्या परिवाराला दहा लाख रुपये नुकसान भरपाई पोटी देऊन आर्थिक मदत व उपजीविकेला आधार दिला जावा.

लहान मच्छिमार व मत्स्य शेतकरी यांचे सभोवतालच्या सागर, नदी, तलाव, पाणवठा इत्यादी नैसर्गिक जलाशयांवरील कायदेशीर अधिकार मान्य करावेत.त्यामुळे त्यांची उपजिविका सुरक्षित राहील व पर्यावरणीय संवर्धन देखिल होईल.

समन्वय अशी मागणी करतो की, सरकारी जलाशयांचा

लिलाव करुन लीज देणे ही पध्दत नाहीशी करावी. पट्टा अधिकार स्थानिक मच्छिमार समुहांना देऊन थेट पोहच व सुरक्षितता बहाल करावी.

खाजगी जलाशयांवरुन हुसकावून लावल्या जाणे व लिज रकमेंत प्रचंड वाढ करणे यामुळे लहान मच्छिमारांचे होणारे शोषण टळावे म्हणून नियंत्रण आणणे अत्यावश्यक आहे.यातून त्यांती दीर्घकाळ चिरायु उपजीविका सुनिश्चित होईल.

क्लायमेट क्रायसिसचा परिणाम म्हणून सागर किनारी वादळांची वारंवारीता व तीव्रता यांत मोठी वाढ झालेली आहे. एकंदरच विविध कारणाने होणारा परिसरातला विनाश व विस्थापन, कार्पोरेटस् अन् सरकार यांचा सततचा हस्तक्षेप यामुळे त्यांची उपजीविका धोक्यांत आलेली आहे. पारंपारिक समुदायांपैकी सर्वाधिक वंचित समाज, अशी परिस्थिती असतांना त्याच्या संविधानिक हक्कांचे संरक्षण व संस्कृतीचा सन्मान याकरिता ते लढत आहेत. मच्छिमार समुहांच्या संविधानिक, पर्यावरणीय व उपजीविकेच्या हक्कांचा समन्वय सन्मान करतो व या लढ्यांचे समर्थन करतो.

मच्छिमार समुदायाच्या प्रमुख मागण्या खाली देत आहोत...

अ).मंडल कमिशनने केलेल्या शिफारशीनुसार मच्छिमार समुहांना सागरी आदिवासी(ट्राईब्ज) म्हणून मान्यता देऊन त्याना सामाजिक व आर्थिक न्याय मिळेल हे सुनिश्चित करावे.

ब) पंचायत ते पार्लमेंट अशा सर्व स्तरांवर त्यांच्यासाठी विशेष संविधानिक चौकट प्रस्थापित करण्यांत यावी.त्यांत त्यांचे थेट प्रतिनीधित्व आणि सागर किनारा व सागरातील संसांधनांवर त्याचे शासन सुनिश्चित करावे.

क) किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (सी झेड एम पी) व किनारा नियंत्रण क्षेत्र (सी आर झेड)कायदा यांची काटेकोर अंमलबजावणी करुन या कायद्यांचे पालन करतांना सरकारची जबाबदेही सुनिश्चित करावी.

ड) मोठी बंदरे (पोर्टस),जेट्टी, खनिजतेल उपसा प्रकल्प व सागरी झीज थोपविण्याच्या उपाययोजना यासह सर्व सागरी प्रकल्पांचा प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु करण्याआधीच,स्वायत्त समिती मार्फत त्यांचा फेरआढावा (रिव्ह्यू) घेण्यांत यावा.या समितीत समुदायाचे प्रतिनीधी व पर्यावरण तज्ञ यांचा समावेश बंधवकारक करण्यांत यावा.सध्या सुरु असलेल्या प्रकल्पांचाही फेरआढावा होईपर्यंत ते सर्व बंद ठेवले जावेत.

इ) तामीळनाडूतील थेनकापटनम आणि केरळ मधील मोथ्थलपोझी येथील अवैज्ञानिक बांधकामांमुळे विस्थापित झालेल्या मच्छिमार परिवारांना तत्काळ नुकसान भरपाई दिली जावी.

प्रश्न केवळ विस्थापनाचा नाही तर मोथ्थलपोझी येथे 80 तर थेनकापटनम येथे 55 पेक्षा जास्त मच्छिमार मेले. त्यांच्या कुडुंबांना नुकसान भरपाई मिळावी अशी आमची मागणी आहे.

ई) कर्नाटकातील नदीवरील होनावर पोर्ट प्रकल्पाला विरोध करतांना अटक केलेल्यांना मुक्त करावे. या प्रकल्पाचे बळी ठरलेल्या व जबरदस्तीने हटवले गेलेल्यांना आणि उपजीविका प्रभावित झालेल्यांना नुकसान भरपाई दिली जावी.

फ) जम्मू–कश्मिर मधील प्रसिध्द वुलार सरोवर व झेलम नदी यांच्या किना–यावरील पारंपारिक पध्दतीने मत्स्यव्यवसाय करणा–यांना हुसकावून लावले जाते आहे, पुनर्वसनाविना. डब्ल्यू सी एम ए म्हणजे जल संवर्धन व व्यवस्थापन विभाग आणि वनविभाग याविस्थापनातून त्यांना आर्थिक संकटात ढकलतो आहे, त्यांचा आत्मसन्मान व उपजीविकेची साधने हिरावून घेत आहे. रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध नसल्याकारणाने त्या कामगारांचे शोषण होईल. समन्वय म्हणून आपण असा आग्रह धरतो आहोत की, या मच्छिमारांना जबरदस्तीने हटविणे तात्काळ थांबविले जावे, त्यांना सुरक्षित निवारा व जमीन अधिकार दिले जावेत.तसेंच समुदायाच्या पुढाकाराने चिरायु उपजीविकांची शास्वती देणा–या आर्थिक विकासाच्या प्रारुपांमध्ये गुंतवणूक करण्यांत यावी.

4. जमीन अधिकार

समन्वय अशी मागणी करतो की, जन आंदोलनांच्या पुढाकाराने व सहभागाने करण्यात आलेला भूमी अधिकार कायदा 2013 याची देशभर अंमलबजावणी केली जाईल याची दक्षता घेतली जावी.या कायद्यांतील सहमती,नुकसानभरपाई आणि पुर्नवसन या संदर्भातील तरतूदी पातळ व कमजोर करण्याकरिता केलेल्या सुधारणा रद्दबादल करण्यांत याव्यात.

5. वन अधिकार

वन अधिकार कायदा (2006)ची संपूर्ण देशभर सर्व राज्यांमध्ये अंमलबजावणी केली जाईल याची सरकारने दक्षता घ्यावी. पोडू लागवडी(झूम पध्दती किंवा फिरती शेती) करण्याकरिता आदिवासींना वैयक्तिक जमीन अधिकार दिले जावेत. वनउपजांवरील त्यांच्या सामुहीक हक्कांना कायदेशीर मान्यता व संरक्षण मिळावे.

समन्वय असा आग्रह करतो की,जम्मू–कश्मिरमध्ये देखिल वन अधिकार कायदा 2006 ची सर्वदूर अंमलबजावणी करण्यांत यावी.वन निवासी व पशुपालक यांचा छळ व त्यांना हुसकावून लावणे संपवावे.सामुहिक वन हक्कांच्या सर्व प्रलंबित दाव्यांना मान्यता द्यावी आणि गावसभा –ग्रामसभांच्या निर्णयांचा सन्मान केला जावा. सरकारने पुलवामा कारेवा परिसरांतील जमीनींची लूट थोपवावी,शेत जमीनी अंधाधुंद पध्दतीने बळकावल्या जाऊ नयेत म्हणून संरक्षण द्यावे आणि शेतक–यांना जबरन हटविले जाऊ नये याकरितां जमीन संरक्षण कायदे बळकट करावेत.

समन्वय आग्रह करतो की, ओडिशा,झारखंड सह सर्वच राज्य सरकारांनी आदिवासींच्या हक्कांचा सन्मान करावा, वनहक्क कायदा 2006 ची काटेकोर अंमलबजावणी करावी आणि बेकायदेशीर खनन थांबवावे. विस्थापितांना न्याय मिळावा म्हणून आयोगाची स्थापना करावी. या आयोगाला विस्थापित समुदायांना संरक्षण देण्याचे आणि पुनर्वसन सुनिश्चित करण्याचे अधिकार असावेत.

6. अन्न सुरक्षा

समन्वयाची अशी मागणी आहे की, अन्नसुरक्षा संदर्भातील मध्यांन्न भोजन, सारख्या योजनामध्ये सर्वाचा समावेश सुनिश्चित व्हावा म्हणून, ज्या संस्था, दिल्या जाणा–या आहारावर धर्माच्या नावाने बंधने आणतात,त्यांना काढून टाकावे. शाळामध्येच ताजे अन्न शिजविता यावे म्हणून सर्व साधनसामुग्री पुरवून स्वच्छ आणि चांगल्या दर्जाचा आहार दिला जाईल, हे काम करणा–यांना पुरेसे मानधन व कामाच्या ठिकाणी चांगल्या सोयी सुविधा दिल्या जातील हे सुनिश्चित करावे.

सन 2021 चे इथेनॉल 20 धोरण इंधन निर्मितीसाठी साखर व तांदुळ, मका अशी आवश्यक धान्य वळविते. यामुळे अन्नसुरक्षा धोक्यांत येईल व किंमती वाढतील. हे धोरण शेतकरी व ग्राहकांपेक्षा उद्योजकांच्याच नफेखोरीला प्राधान्य देत, भूक व आर्थिक तणाव वाढवते आहे. म्हणून समन्वयाची मागणी आहे की, हे इथेनॉल 20 धोरण सरकारने रद्द करावे.

7. ऊर्जा धोरण व अणू ऊर्जेला नकार...

क्लायमेट क्रायसिस म्हणजेच पर्यावरणीय संकटाला सामोरे जाण्यासाठी ऊर्जाधोरणांत योग्य बदल करण्याची आवश्यता आहे हे निश्चित. समन्वयाचा आग्रह राहिलेला आहे की ऊर्जा धोरण हे लोक केंद्री असावे. पर्यावरणावर कमीतकमी आघात होईल असे ऊर्जेचे पर्याय निवडले जावेत व विकेंद्रीत पध्दतीने ऊर्जा निर्मितीवर भर असावा. ऊर्जेचा वापर काटकसरीने करण्याबाबत दक्षता घेतली जावी असा समन्वयाचा आग्रह आहे. मात्र सध्याचे कार्पोरेट धार्जिणे सरकार आदाधुंदपध्दतीने अणू ऊर्जाप्रकल्प पुढे रेटण्याचा प्रयत्नांत आहे. मध्यप्रदेशातील चुटका तसेंच महाराष्ट्रातील जैतापूर या अणूऊर्जा प्रकल्पांना विरोध करणा–या संघर्षांचे समन्वय समर्थन करतो कारण जाहीरात केली जाते तशी अणूऊर्जा ग्रीन, क्लीन व स्वस्त ही नाही. अणूऊर्जा प्रकल्पांमुळे पर्यावरणावर, समाजावर अन् मानवासह सर्व सजीवांवर होणारे परिणाम अत्यंत घातक आहेत.

समन्वयाची मागणी आहे की,अणूऊर्जा प्रकल्पां ऐवजी ती गुंतवणूक सरकारने पवन ऊर्जा, सौर ऊर्जा निर्मितीत करावी. हे करतांना पर्यावर्णीय न्याय व समाजाची स्वायत्ता यावर भर दिला जावा. समन्वय नेहमीच युध्द नको म्हणतोच, अणूयुध्द तर कधीच कुठेच नको.

8. जेंडर जस्टीस...(लिंगनिरपेक्ष न्याय)...

सर्व स्तरांवरील निर्णय प्रक्रियेत महिला व तृतीय पंथियांसह समतोल राखला जावा, यासाठी त्यांना प्रतिनिधित्व मिलावे म्हणून किमान 33 टक्के (खरतर 50 टक्के) आरक्षण असावे. हा समावेश थेट पार्लमेंट– लोकसभा पासून विधानसभा, गावसभेसह सर्व पंचायती राज संस्था, शहरी वार्ड– समितीसह सर्व नगरपालिका व महानगरपालिका आणि सरकारने नेमलेल्या सर्व समित्यांवर असणे बंधनकारक करण्यांत यावे.

शासकीय बजेटपैकी किमान 30 टक्के नीधी हा वंचित घटकातील महिला व तृतीय पंथीयाकरिता राखीव असावा. त्यातून

त्याना शिक्षण,आरोग्यसेवा, रोजगार आणि सामाजिक सुरक्षा याची व्यवस्था तातडीन केली जावी याकरिता समन्वय पाठपुरावा करेल.

कार्पोरेट लिडरशिप, शैक्षणिक बोर्ड, सार्वजनिक केंद्र व नियमन आयोग यामध्ये देखिल 33 टक्के प्रतिनिधित्व सुनिश्चित करावे व त्यात वंचित गटांना प्राधान्याने स्थान मिळावे यासाठी समन्वय आग्रह धरेल.

9. नागरी अधिकार...

समन्वयाचा आग्रह आहे की,आफसा म्हणजेए फ पी एस ए, यु ए पी ए आणि पी एस ए असे क्रूर कायदे रद्दबादल (रिपील) करावेत, समाजात नागरी अधिकार व लोकतांत्रिक स्वातंत्र्य पुर्नस्थापित करावे, पत्रकार, कार्यकर्ते यांचा छळ थांबवावा आणि त्यांच्या कार्याकरिता (बेकायदेशीर)अटक केलेली आहे, त्या सर्वाना मुक्त करावे. अटकेचा धाक न वाटता अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचा सन्मान केला जावा.

तसेंच जम्मू अँड कश्मिर पुनर्रचना (रिऑरगनायझेशन) कायदा (2019) रद्द करुन आर्टिकल 370 व 35 ए पुर्नस्थापित (Reinstate) करावेत. स्थानिकांचे स्वशासन मजबूत करण्याकरिता बडगाम सह जिल्हा विकास समितीं (डी डी सी) च्या निर्णयांचा सन्मान करावा.

लोकशाही पध्दतीने कामकाज व्हावे व जबाबदेही असावे याकरिता राज्य माहीती आयोग (एस आय सी), राज्य जबाबदेही आयोग (एस ए सी), राज्य निगराणी आयोग (एस व्ही सी), राज्य मानव अधिकार आयोग (एस एच आर सी) आणि महिला आयोग पुर्नस्थापित व कार्यान्वित करण्यात यावेत.

जगण्याचा अधिकार आणि उपजीविका व पर्यावरणीय न्यायासाठी संघर्षरत लोकलढ्यातील नेते,कार्यकर्ते व सामान्य लोक यांच्यावरील सर्व खोट्या व रचित केसेस रद्द कराव्यांत, यु ए पी ए, आफसा व सिडेशन सारख्या पाशवी कायद्यांचा वापर करत जनआंदोलनांना गुन्हेगार ठरविणे थांबवावे.

छत्तिसगड मध्ये कागर ऑपरेशन नावाने सुरु असलेली दडपशाही तात्काळ थांबवावी, कारण याचा वापर आदिवासी, कार्यकर्ते व लोकशाही साठी आवाज उठविणा-यांना टार्गेट करण्याकरिता केल्या जातो.

10. प्रशासनांत पारदर्शिता, जबाबदेही व देखरेख संस्थांची भूमिका...

समन्वयाचा असा आग्रह आहे की, इलेक्शन कमिशनरस् च्या नियुक्ती कायद्यातील मुख्य न्यायाधीशाला हटवणे, निवडणूकांच्या संबंधित नियमांत 2024 मध्ये केलेले बदल व मतदार याद्या, फार्म 17 सारखे कळीचे निवडणूक दस्तावेज जनतेला न दाखवणे या संपूर्ण षडयंत्राचे चाक उलटे फिरवावे.

समन्वय आग्रह करतो की, न्यायव्यवस्था स्वतंत्र, दर्जेदार व विविध जनसमुदायांचा समावेश असलेली हवी. जबाबदेहीच्या सुनिश्चतेतेकरिता स्वतंत्र कमिशन असावे, जे न्यायाधीशांच्या नेमणूका व त्यांच्या संदर्भातील तक्रारींची दखल घेईल. पारदर्शिकता टिकावी म्हणून सर्व प्रशासकीय दस्तावेज लोकांना बघता यावे अशी व्यवस्था असावी.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार सर्व राज्य व केंद्र सरकारांनी सगळ्या रिकाम्या जागा तातडीने भराव्यांत असा समन्वयाचा आग्रह आहे.

समन्वय अशी मागणी करतो की, माहितीचा अधिकार कायदा,सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व अन्य कायद्यांनुसार स्थानिक भाषांमध्ये सर्व माहिती ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने उपलब्ध असावी. यात एफ आय आर एस चा देखिल समावेश असावा. स्वच्छंदपणे एफ आय आर वर संवेदनशील असा शिक्का मारुन माहिती दडविण्याची पध्दत तत्काळ संपवावी.

कॉनफ्लिक्ट झोनस् म्हणजे युध्द,संघर्ष किंवा विवाद असलेल्या क्षेत्रांत पोलिसांना अर्धसैनिक दलापासून स्वतंत्र ठेवले जावे. त्यावरील देखरेख ही एस सी एस टी कमिशन, मानव हक्क आयोग, महिला हक्क आयोग या सारख्या आयोगांकडे असावी ज्यामुळे हक्कांच्या उल्लंघनांला आळा बसवला जावा. पारदर्शीता व जबाबदेही राखली जावी म्हणून कस्टडीत घेतलेल्यांची व अटक केलेल्यांची नावे प्रशासनाने तात्काळ सार्वजनिक करावीत. व्हीसल ब्लोअरस् प्रोटेक्शन अँक्ट म्हणजे सावध करणा-यांचे संरक्षण करण्याबद्दलचा कायदा, 2014 साली अस्तित्वात आला पण आजही सरकार त्याची अंमलबजावणी करत नाही. उलट मागील दहा वर्षांत भ्रष्टाचार व सत्तेचा दुरुपयोग याची माहिती देणा-या अनेकांवर हल्ले केले गेले, काही जीवाला मुकले.

समन्वय अशी मागणी करतो की, या कायद्याची तात्काळ अंमलबजावणी केली जावी. शिवाय 2011 मध्ये पार्लमेंट मध्ये चर्चा करण्यात आलेले तक्रार निवारण बिल, ज्यांत निश्चित वेळांत व विकेंद्रित पध्दतीने निवारण अपेक्षित आहे, ते आणले जावे.

11.पॅलेस्टईन संबंधित

समन्वय पॅलेस्टीनमधल्या लोकांचे समर्थन करतो आणि अंधाधूंद हल्ला करुन त्याच्या वस्त्या, इस्पितळे, शाळा व सर्व पायाभूत सुविधांचा सर्वनाश करणा–या व निष्पाप लहान मुलं–महिलां सह मोठा जनसंहार करणा–यांचा व त्याच्या पाठिराख्यांचा धिक्कार करतो.

भारत सरकारने इस्रायल सोबतच्या शस्त्रास्त्र खरेदीसह मिलिटरी व आर्थिक संबंध ठेवणे याचा तीव्र निषेध करतो. मोदी सरकारचे पॅलेस्टीन मधून हुसकावून लावलल्यांच्या जागी भारतीय कामगारांना पाठवण्याचे धोरण अतिशय लांच्छनास्पद आहे. समन्वयाचा आग्रह आहे की,भारताच्या वसाहतवाद विरोधी परराष्ट्र धोरणावर सरकारने ठाम रहावे व पॅलेस्टीनी जनतेच्या मुक्ती लढ्याचे समर्थन करावे.

12.नागरिकता संबंधित कायदे

समन्वयाच्या हैद्राबाद संमेलनांत उपस्थित आम्ही सर्व खालील ठराव सर्वसहमतीने पारित करतो आहोत.

भारतात राहणा–या सर्वांची त्यांचा धर्म,जात वंश, कुठल्या सामाजिक समुहाचा, याआधारे भेदाभेद न करता,भारतीय नागरीक म्हणून ओळख मान्य करण्यांत यावी. सी ए ए कायद्याचा उपयोग काहींना वगळण्यासाठीचे, बंदी बनविण्याचे हत्यार म्हणून केला जाऊ नये.

2. आम्ही नॅशनल पाप्युलेशन रजिस्टर(एन पी आर) व नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझनस(एन आर सी) व तत्सम कायदेशीर चौकटी तयार करण्याच्या प्रक्रियांचा जोरदार विरोध करतो कारण त्या समुदायांमध्ये फूट पाडणे व काहींना वंचित करण्याच्या उद्देशानेच रचलेल्या आहेत.

3. आम्ही संविधानातील अनुसूची क्रमांक पाच व सहा सह आदिवासींच्या व आदीम समुदायांच्या हक्कांचे संरक्षण करणा–या विधानांना व संकेतांना आमची बांधिलकी पुन्हा जाहीर करतो.

4. आम्ही सर्वव्यापी जात आधारित जनगणना करण्यांत यावी अशी मागणी करतो कारण त्यातून समन्यायी प्रतिनीधित्व व संसाधनातील वाटा निश्चित करता येईल.

5. आम्ही भारतातील मुस्लिमांना सतत टार्गेट करण्याच्या भाजपाच्या प्रयत्नांचा तीव्र निषेध करतो. अशा खोट्या कहाण्या उघड करण्यासाठी व त्यांचा विरोध करण्याकरीता केल्या जाणा–या सत्यशोधन प्रयत्नांचे, माहिती अधिकार मोहिमांचे व जनतेच्या कृतींचे समर्थन करतो.

6.आम्ही भारतीय समाजातील विविधतेचा व अनेकत्वाचा सन्मान करतो. सर्व समुहांचे भेदभाव आणि शासक–प्रशासक यांच्याकडून दडपशाही यापासून संरक्षण करण्यासाठी बांधिल आहोत.

लोकशाहीशी विसंगत अशा सरकारच्या धोरणांचा विरोध करण्यासाठी जागृत नागरिकांनी, समाजातील विविध गटांनी व लोकशाहीवादी संघटनांनी आम्हाला साथ द्यावी अशी आम्ही विनंती करतो. नागरिकता व समान अधिकार मिळविण्याकरिताचा हा लढा लोकशाही, न्याय व जनतेचा सन्मान टिकविण्यासाठी मूलभूत आहे.

संकलन आणि अनुवाद: सुहास कोल्हेकर

उरलेले लेख व वृत्तांत पुढील अंकात!

हैदराबाद येथील NAPM च्या चार दिवसीय संमेलनात पार पडलेल्या अनेक सत्रांचे वृत्तांत या अंकात आलेले आहेत. जागे अभावी समाविष्ट होवू न शकलेले पुढील लेख/वृत्तांत पुढील अंकात.

१) पहिल्या दिवशी साथी अरुणा रॉय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'आम्हांला भारत कसा हवा? कसा नको!' यावर झालेल्या परिसंवादाचा वैभवी आढाव व मीनल उत्तुरकर यांनी बनवलेला खास वृत्तांत

२) राजकीय पक्ष व जन आंदोलनांची जबाबदारी या सत्राचा सिरत सातपुते यांनी बनवलेला वृत्तांत

३) १४ गट चर्चांमध्ये झालेल्या गटचर्चेचे त्या त्या गट संयोजकांनी तयार केलेले संक्षिप्त अहवाल.

राजकारण

कार्यकर्ता शक्ती आणि सत्ता मिळवतो लोकांकडून, जनआंदोलनांकडून!

मिनाक्षी नटराजन

(हैदराबाद संमेलनात अखेरच्या दिवशी 'संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणात राजकीय पक्ष व जन आंदोलनांची भूमिका' या विषयावरील परिसंवादात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या तेलंगणा राज्य प्रभारी, माजी खासदार व सर्वोदयी कार्यकर्ता मिनाक्षी नटराजन यांनी मांडलेले विचार.)

माझी ओळख जरी, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या तेलंगणा राज्याची प्रभारी व माजी खासदार अशी करुन दिली असली तरी मी स्वत:ला सर्वोदयाची कार्यकर्ता मानते व सर्वोदयाची कार्यकर्ता म्हणूनच मी NAPM मध्ये येत असते. सर्वोदयाच्या कामात जिथे जिथे मला गतिरोध दिसतो तिथे तिथे अहिंसेच्या मार्गाने प्रेम व करुणेने मी त्याचा सामना करत आलेली आहे. स्वत:ला वा स्वत:च्या पक्षाला प्रतिक्रियावादी नाही तर मत मांडण्यासाठी म्हणून अहिंसक संघर्षाच्या स्वरुपात मी सादर करु इच्छिते.

दोन गोष्टींबाबत मी सांगू इच्छिते. तेलंगणात काम करण्याची जबाबदारी मला दिली आहे. मेधाताई – मेधा पाटकर आज सकाळी हैदराबाद मधील मुसी नदीवर गेल्या होत्या पण तिथे जायला त्यांच्याकडे संमती नव्हती. (स्थानिक लोक तिथे येवू घातलेल्या सरकारी प्रकल्पाविरोधात लढत आहेत.) एखाद्या प्रगतीशील सरकारची जी वेगवेगळी तंत्र आहेत त्यांच्याकडून ही अपेक्षा करणं फोल आहे की, ते हा प्रश्न विचारु शकतील. लोकशाही देशात लोकशाही पध्दतीने, अहिंसात्मक अंगाने जनआंदोलन उभे करण्याचा आणि त्याच्या परिघात राहून लढाई लढण्याचा प्रत्येक भारतीय नागरिकाला अधिकार आहे. आणि त्या अधिकारावर प्रश्न विचारण्याचा दुसऱ्या कोणाला हक्क नाही. या लढाईत ते धरणे धरण्याचे, एकत्रित भाजी भाकरी खाण्याचे लोकशाहीचं स्पिरीट अबाधित राहिले पाहिजे. त्यासाठी मी पूर्णत: वचनबध्द आहे. दुसरी गोष्ट म्हणजे भूमीअधिग्रहण व हक्क आधारित संरचनेच्या लढाईत आमच्या पक्षाचे सरकार आणि सर्वोदयचे सर्व कार्यकर्ते, आम्ही सर्व जण सोबत आहोत. या लढाईत रेषेच्या अलिकडे जिथे तुम्ही आहात तिथे कमीत कमी मला तरी तुमच्यासोबत नेहमी उभे असलेले बघाल. मी हा तुमच्यासमोर शब्द देतेय जो पूर्ण करण्याचा माझा नेहमी प्रयत्न असेल.

समाजवादी पक्षाच्या प्रतीनिधी साथींनी इथे निर्भयपणे आम्हा सर्वच राजकीय पक्षांच्या बहादुरीच्या अभावाबद्दल प्रांजळ कबुली दिली. हे खूप कमी ठिकाणी शक्य होतं. ही कबुली इथे शक्य होतेय. पण त्याचबरोबर आजच्या काळात जगात आमच्या आसपास आणि आमच्या देशातही काय होतय याचेही ज्ञान आपल्याला मिळणे गरजेचे आहे. मागच्या काळात राष्ट्र राज्याची जी संकल्पना आहे त्याबद्दल खूप प्रश्न विचारले गेले आहेत. सर्वात महत्वाचा प्रश्न हा असतो की राष्ट्र म्हणजे काय? तर राष्ट्र म्हणजे लोक, निसर्ग आणि त्याच्यांमधले संतुलन. परंतु आता हे राष्ट्र आहे याच्यावर सतत राज्याची सत्ता होताना दिसत आहे. आणि म्हणून तुम्ही कोणतेही जनआंदोलन उभं करता तर बुलडोझर चालवले जातात. जनआंदोलन उभं राहिलं तर त्याच्या समोर हे सांगितलं जातं की हे काहीतरी राष्ट्राच्या विरोधात आहे. म्हणजे असं की जेव्हा आपण राष्ट्राचे प्रतिनिधित्व करतो तेव्हा राज्याला म्हणजेच स्टेटला ते आवडत नाही. अशावेळी एक प्रश्न असा आहे की आजकाल राष्ट्र राज्याची संकल्पना काय उरली आहे?

दुसऱ्या महायुध्दानंतर जेव्हा ही राष्ट्र राज्याची संकल्पना आली तेव्हा ती पूर्ण जगातच कमी अधिकपणे पसरली. या राष्ट्र राज्याच्या बाबतीत असा विचार केला जायचा की हे राष्ट्र राज्य सार्वभौमिक असेल. त्याच्याकडे एक प्रदेश असेल आणि ते आपले चलन छापेल, आपल्या कराची एक व्यवस्था बनवेल वा आपले आर्थिक व्यवस्थापन करेल, त्या आर्थिक व्यवस्थापनाच्या आधारावर आपल्या भौगोलिक प्रदेशाच्या आतील जे नागरिक आहेत त्यांच्यासाठी वेगवेगळी राजकीय, सामाजिक, आर्थिक व्यवस्था कायम करेल. त्याच्या अंतर्गत नियम व कायद्यांचे राज्य स्थापित करेल. मग तिची आपली एक सेना असेल. तसेच इतर प्रदेशांच्या बरोबर संबंध स्थापन करण्यासाठी परराष्ट्र मंत्रालय असेल. आणि

मग या राष्ट्रांचे एक साहचर्य असेल ज्याला आपण संयुक्त राष्ट्र म्हणतो किंवा वेगवेगळ्या तशा प्रकारच्या संकल्पना असतील ज्यात नागरिकतेच्या पलिकडचे असूनही व्यापक मानवता आणि व्यापक पर्यावरणाच्या विषयी आपण बोलू शकू.

परंतु आज आपण काय बघतो आहोत? ही जी पूर्ण राष्ट्र राज्याची संकल्पना आहे ती मार्केट राज्य झालेली आहे. राष्ट्रासाठी काही जागा शिल्लकच राहिलेली नाही. राष्ट्र म्हणजे ‘भारत माता की जय’ च्या बाबत नेहरुंनी ‘डिस्कव्हरी ऑफ इंडिया‘त लिहिल्याप्रमाणे, भारत म्हणजे भारतातील लोकं, भारताचा निसर्ग, यांना काहीही आवाज नाही आहे. आता पूर्णपणे मार्केटराज्य आहे आणि ती वागणूक फक्त आपल्याच देशात नाही तर सगळ्या जगातच सत्तेत बसलेल्या लोकांच्या माध्यमातून आम्हाला बघायला मिळत आहे. आज आपण अमेरिकेत जे ट्रंप करताहेत ते काय बघतो आहोत? कधी त्यांची नजर ग्रीनलँडवर आहे, कधी गाझा पट्टीवर तर कधी कॅनडावर आहे. सगळीकडेच त्यांची नजर आहे.

आम्ही बघतोय की प्रत्येक देशातील काही ठराविक लोक आहेत जे ठरवत आहेत की तो देश किती कर बसवेल व कशावर बसवेल? जसं की गरीब व्यक्ती जो कुठूनही पिण्यासाठी तयार चहा विकत घेईल वा चहा पावडरचं पाकीट विकत घेईल, तोही तितकाच अप्रत्यक्ष कर (indirect tax) भरत आहे जितका अदानी वा अंबानी भरत असतील! आमची काही त्यांच्याशी दुष्मनी नाही. पण त्यांच्या धोरणांशी आणि त्यांच्या एकाधिकारशाहीशी (monopoly शी) आमची लढाई आहे. आणि म्हणून त्यांचे नाव घेत आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे, जे काही कर रुपात जमा होतंय त्याचं व्यवस्थापन कसं व्हावं, त्याचा आर्थिक सामाजिक कार्यक्रम कसा असावा; हे जगातील १ टक्के लोक ठरवत आहेत. त्यात मस्क असेल वा आपल्या देशातील सत्तारुढ पक्षांचे दोन भांडवलदार मित्र असतील. त्याचा परिणाम हा होतो की, हळूहळू नागरिकतेला गंज चढत जातो आणि विविध प्रदेशांत लाभार्थी तयार केले जातात. ‘लाडकी बहीण‘ वा अन्य योजना या लाभार्थी तयार करण्याचा प्रयत्न आहे. २००४ पासून २०१४ पर्यंतचे विविध हक्क आणि अधिकाराचे कायदे (ज्यांच्या संरक्षणासाठी आमचे आपल्या पक्षाचे लोकही आज काम करत नाहीत हे मी प्रामाणिकपणे मान्य करत आहे) आणि आताच्या योजना, यात फरक काय आहे? त्यावेळी नागरिकता रचण्याची गोष्ट होती इथे लाभार्थी बनवण्याची बाब आहे. हा या पूर्ण संकल्पनेतील एक प्रकारचा आदर्शांतील बदल आहे.

तिसरी गोष्ट, विविध देशांशी आपले संबंध काय व कसे असतील? सध्या आपले परराष्ट्र मंत्री आणि आपले राष्ट्र ठरवत नाहीत की विविध देशांशी आपले संबंध कसे असतील, तर भांडवलदार त्यांच्या सोबत जातात मग ते ठरवतात. कारण विविध देशांत काय काय सौदेबाजी होऊ शकेल, कोणत्या दोन उद्योगपतींबरोबर व्यापार करार करता येईल, हे ठरविण्यासाठी सगळं परराष्ट्र मंत्रालय समर्पित आहे.

चौथी गोष्ट आहे, ही मिलिट्रीची. ही खूपच गंभीर बाब आहे (कमीत कमी मला तरी ती अंतर्बाह्य हलवते) की आत्ता वेगवेगळ्या मिलिट्रीला तयार करण्यासाठी खाजगी कंपन्या तयार होत आहेत. त्यांची कोणत्याही देशाप्रती जबाबदारी नाही. जसे निवडणूका व्यवस्थापन होतं तसं जर मिलिट्रीचे व्यवस्थापन झालं तर कोणत्याही राष्ट्राच्या प्रती वा कोणत्याही मानवतेच्या मूल्यांच्या प्रती त्यांची जबाबदारी नसते तर ज्यांच्याकडून ते पगार घेतात त्यांच्याप्रती त्यांची जबाबदारी असते. याचे भविष्य काय असेल, हे सांगता येणार नाही!

पाचवी बाब, ही राष्ट्रांच्या साहचर्याची आहे. मेधाताईंना हे माहित आहेच की लोकसंख्येच्या ८ टक्के आदिवासी लोकांचे निर्वासितांमध्ये ५५ टक्के प्रमाण आहे. जगात ६५ दशलक्ष लोक निर्वासित आहेत, ज्यांना कोणतेही मोठे देश आपल्याकडे बोलवायला तयार नाहीत. हे सगळे देश आहेत ज्यांचा GDP खूप जास्त आहे. पण त्यांच्या मनात, त्यांच्या नकाशात यांच्यासाठी काहीच जागा नाही आहे. हे काय होतय? हे जे राष्ट्रांचे साहचर्य संयुक्त राष्ट्र म्हणून जे मानलं जात होतं आता ते राष्ट्रांचे साहचर्य उरलं नाही. तर मार्केट प्रवाहांचे साहचर्य आहे जे ठरवत आहे की राष्ट्रांचे साहचर्य कसे असावे व त्यांनी कसे वागावे!

या सगळ्याला व्यवस्थित समजून घेऊन वेगवेगळ्या ठिकाणी जे आपले समुदाय आहेत त्यांना गर्दी बनविण्यासाठी पकडून ठेवण्यात हे लोक राष्ट्र राज्यांमध्ये व्यस्त आहेत. जर तुम्ही समूहांना, त्यांच्या सामूहिकतेला, त्यांच्या नैसर्गिक विवेकाला जर गर्दीत रुपांतरीत कराल तर मग ते टाळ्या वाजवतील, थाळ्या वाजवतील,

दिवे लावतील वा कुंभमध्ये रेकॉर्ड तोडण्या इतके लोक जातील, आणखीही अनेक गोष्टी होतील. पण मग जे मुख्य मुद्दे असतील, त्यांच्यावरुन त्यांचे लक्ष विचलित होईल. आणि आम्ही सगळे हेच बनत चाललो आहोत. आम्ही सर्व एक गर्दीचा देश बनत चाललो आहोत. आणि त्याच्यात जे सगळ्यात जास्त हरवले आहेत ते राजकीय पक्षांचे कार्यकर्ता आहेत.

जरी मीही राजकीय पक्षाची कार्यकर्ता असले तरीही हे मी खूप विनयाने सांगू इच्छिते की आम्ही हे विसरलो आहोत की कार्यकर्ता काय असतो? आम्हाला वाटते की सत्ता कुठून तरी वरुन सरकार आल्यावर मिळते आणि आमचं हे काम आहे की ते जे वर बसलेले आहेत त्यांच्या मागे पुढे फिरत राहावे आणि मग तिथून काही छोटं मोठं मिळवणे, गाडी - पोलीस कर्मचारी वगैरे, ती सत्ता आहे. आम्ही हे विसरलो आहोत की खरा कार्यकर्ता हा आपली शक्ती, सत्ता मिळवतो ती लोकांकडून, जनआंदोलनांकडून! म्हणून जनआंदोलनांबरोबरचा संवाद खूप महत्वाचा आहे.

तुम्ही जन आंदोलक सरकारमध्ये कदाचित सामील नसाल परंतु तुम्ही सर्व कार्यकर्ता आहात. तुम्ही सर्व राजकारण करत आहात. राजकारणाचा अर्थ आहे की सामाजिक आर्थिक परिवर्तनासाठी काम करणे. आणि तुम्ही लोक एक दूरगामी राजकीय, सामाजिक, आर्थिक परिवर्तन व पर्यायी व्यवस्था निर्मितीसाठी काम करत आहात. मी सांगू इच्छिते की सर्वात जास्त राजकारण तुम्ही लोक करत आहात. जे राजकीय पक्षांत बसले आहेत ते माहित नाही नक्की काय करत आहेत. मला स्वत:ला अनेकदा वाटतं की काय करतोय आम्ही सर्वजण! आणि म्हणून जे वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ता आहेत त्यांच्याशीही असाच संवाद करण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत.

जोपर्यंत राजकीय पक्षांचे राजकीयीकरण (politicisation of political party) होत नाही, जोपर्यंत लोकांच्या मुद्द्यांची लढाई लढणारे कार्यकर्ते त्यांना समजत नाहीत तोपर्यंत हे काम पूर्ण नाही होणार. आणि विरोधी पक्ष असण्याच्या नात्याने मी तर मानते की इंडिया आघाडीचे जेवढे घटक पक्ष आहेत त्या सर्वांच्या पुढे एक यक्ष प्रश्न आहे की, विरोधी पक्षाच्या राजकारणाने भागणार नाही तर पर्यायी सामाजिक – आर्थिक - राजकीय व्यवस्थेसाठी आपण सर्वजण मिळून काम करु तेव्हाच काहीतरी होईल. तुमच्या सर्वांकडून ही उमेद मला दिसते आहे आणि आम्हाला सर्वांना त्या दिशेने काही ना काही निर्माण करण्याची गरज आहे.

आमच्या युगाची मला दोन आव्हाने दिसतात. मी एका भूगोलाची नागरिक आहे. आता नागरिकता ही वर्णव्यवस्थेचा नवीन मापदंड बनायला लागली आहे. मी जेव्हा जन्माला आले तेव्हा मला मी कुठल्या प्रदेशात जन्मणार हे माहित नव्हते परंतु जेव्हा अमेरिकेतून ई कचरा माझ्या देशात पाठवला जातो तेव्हा माझ्या धोरणांवर, माझ्या जीवनावर परिणाम तर होतोच. तिकडे ते काही परमाणू करतात तर मला श्वास घ्यायला अडचण येते. तर तिथे जी धोरणं ठरतात त्यात मलाही काही बोलता येईल असा मला हक्क असायला नको का? हे कोणी ठरवले की प्रदेशाच्या आधारावरही प्रतिनिधित्व असावे. भूगोला व्यतिरिक्तही विविध क्षेत्र आहेत ज्यांचे प्रतिनिधित्व व्हायला हवे. स्थानिक समुदायाचे लोक जे ठिकठिकाणी वेगवेगळे राहात आहेत ते जेव्हा सारख्याच आव्हानांचा सामना करतात तेव्हा त्यांचे प्रत्येक ठिकाणी मत का असू नये? हा आमच्या समोरचा नवा प्रश्न आहे.

आजची स्थिती काय आहे? एकीकडे मार्केट राज्य चालू आहे तर दुसरीकडे असंही संभव आहे की एकीकडे एक कंपनी ठरवेल की माझ्या देशाचे शेतकरी कोणती बियाणं पेरतील. माझ्या देशाचे लोक इथे राहत आहेत आणि माहित नाही कोणत्या कंपनीचे लोक ज्यांचे मुख्यालय अमेरिका वा चीन मध्ये असेल, त्यांच्यासाठी काम करत असतील तर कामाचे तास या तीन चार देशांतील लोक ठरवतील. आणि मग लार्सन अँड टुर्बो ९० तास काम करण्याचं विधान करते. कारण त्यांना तर काहीच फरक नाही पडत. या ज्या नव्या वसाहती तयार झाल्या आहेत त्यांना तोंड देण्याची तयारी आम्हाला करावी लागेल आणि हा भूगोलापेक्षा मोठा मामला आहे.

गिग वर्कर्स करीता काम करणारे हैदराबादचे शेख सलाउद्दीन भाई, मंदसौर पासून पूर्ण देशभरात या कामगारांची एक समस्या आहे तर त्यांचा आवाज पोहोचत आहे का हा आमच्या समोर प्रश्न आहे. आज काम करणारे वेगवेगळे संघटीत गट आहेत ज्यांच्या आपापल्या समस्या आहेत त्यांना आपल्या लोकशाहीत आवाज मिळायला नको? आणि जर मिळत नसेल तर त्यांच्यासाठी

(पान ३६ वर)

संमेलनात निर्वाचित National Working Group

हैदराबाद संमेलनात पुढील काळासाठी NAPM च्या कामाची राष्ट्रीय स्तरावर जबाबदारी पार पाडण्यासाठी पुढील २६ सहकाऱ्यांची राष्ट्रीय कृती गट (National Working Group - NWG) सदस्य म्हणून निवड करण्यात आली. यापैकी काही सदस्य हे त्यांच्या त्यांच्या राज्य संमेलनातून निवडण्यात आले होते.

- फादर आनंद मॅथ्यू – उत्तर प्रदेश
- अंजली भारद्वाज – दिल्ली
- आराधना भार्गव - मध्य प्रदेश
- अरुंधति धुरू - उत्तर प्रदेश
- आशिष कोठारी – उत्तराखंड
- आशिष रंजन – बिहार
- कॉम्रेड फ्रँको – तेलंगणा
- डॉ. गुलाम रसूल शेख – जम्मू काश्मीर
- किरण विसा – तेलंगणा
- लिंगराज आझाद – उदिशा
- लिंगराज प्रधान – उदिशा
- सिस्टर लिसी – तेलंगणा
- मेधा पाटकर
- मीरा संघमित्रा – तेलंगणा
- सी. आर. नीलकंदन – केरळ
- प्रफुल्ल सामंतरा – उदिशा
- ॲड. पुरबायर – पश्चिम बंगाल
- राजीव यादव – उत्तर प्रदेश
- रामबेटी – उत्तर प्रदेश
- रिचा सिंग – उत्तर प्रदेश
- सलौद्दीन शेख – तेलंगणा
- संजय मंगला गोपाळ – महाराष्ट्र
- शाहिद कमाल – बिहार
- सौम्य दत्त – दिल्ली
- सुनीती सु. र. – महाराष्ट्र
- युवराज गटकळ – महाराष्ट्र

ज्या राज्यात या नंतर राज्य संमेलन होईल, तेथून NWG मध्ये सदस्य जोडले जातील. ज्या कृती गट किंवा विषयवार फोरम्स चे प्रतिनिधित्व NWG मध्ये पुरेसे नाही, त्यातील काही सदस्य व आवश्यकतेनुसार अन्य सदस्य NWG मध्ये स्वीकृत करण्यात येतील.

राष्ट्रीय कृती गट सदस्यांचा थोडक्यात परिचय

मेधा पाटकर या NAPM च्या स्थापनेपासून किंवा त्या आधीपासून या प्रक्रियेत सक्रीय आहेत. गेली ३९ वर्षे नर्मदा घाटीत संघर्ष – निर्माण साथ साथ या रीतीने नर्मदा बचाओ आंदोलन आणि नर्मदा नवनिर्माण अभियान यांच्या संस्थापक. २००५ पासून मुंबईतील गरीब वस्त्यांच्या जगण्याच्या हक्कासाठी घर बचाओ घर बनाओ आंदोलन सुरू करण्यात पुढाकार. त्याद्वारे अनेक बिल्डरांच्या मुजोरीला लगाम घालून गरिबांच्या घरांचा हक्क मिळवून दिला. असंघटित मजुरांमध्ये कार्यरत श्रमिक जनता संघ या युनियनच्या अध्यक्ष. सर्व नद्यांच्या संरक्षणासाठी मंचात सक्रीय. संयुक्त किसान मोर्चा या देशव्यापी शेतकरी आघाडीत सक्रीय व त्यांच्या कार्यकारिणीतील एकमेव महिला प्रतिनिधी. अनेक न्याय्य कायदे आणि धोरणे तयार करण्यात हस्तक्षेप.

अरुंधति धुरू या NAPM च्या स्थापनेपासून यात सक्रीय. सुरूवातीला अनेक वर्षे नर्मदा घाटीत पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून नर्मदा बचाओ आंदोलनात सक्रीय. सध्या उत्तर प्रदेशात लखनौ येथे शहरी गरीब वस्त्यांमध्ये काम. या शिवाय अन्न अधिकार अभियान, महिला मंच, राष्ट्रीय रोजगार हमी योजना मंच आदी राष्ट्रीय स्तरावर सक्रीय.

मीरा संघमित्रा या तेलंगणात सक्रीय साथी सुरूवातीला अनेक वर्षे नर्मदा घाटीत नर्मदा बचाओ आंदोलनात सक्रीय. पारलिंगी समुदाय, गरीब अल्पसंख्यांक या घटकात विशेष काम. राष्ट्रीय स्तरावरील अनेक मंचात सक्रीय.

सिस्टर लिसी या तेलंगण, आंध्र प्रदेश व अन्य दक्षिणी राज्यात घरेलू कामगार, अन्य असुरक्षित कामगार आणि स्थलांतरित माजू यांच्यात गेली २७ वर्षे सक्रीय. या कामगारांसाठी कार्यरत राष्ट्रीय मंचांमध्ये प्रतिनिधीत्व.

रामबेटी व ऋचा सिंह या उत्तर प्रदेशातील सीतापूर

जिल्ह्यात संगीतिण किसान मजदूर संघटनेच्या माध्यमातून सुमारे २० वर्षांपासून सक्रीय आहेत. अन्याया विरुद्ध झगडण्यासाठी महिला – युवा – किसान – मजूर यांची एकत्रित शक्ती विकसित करण्यावर भर असून संयुक्त किसान मोर्चा या राष्ट्रव्यापी किसान मंचाच्या उत्तर प्रदेशातील कामात त्यांचा विशेष पुढाकार आहे.

सुनीती सु. र. या NAPM च्या प्रक्रीयेत सुरुवातीपासून सहभागी असून गेली १० वर्षे त्या राष्ट्रीय समन्वयक आहेत. त्याआधी त्यांनी महाराष्ट्र समन्वयकाची जबाबदारीही पार पाडलेली आहे. पश्चिम महाराष्ट्रात लवासा, वांग मराठवाडी आणि टाटा धरणग्रस्त प्रभावितांच्या लढ्यात त्यांचा सक्रीय सहभाग राहिलेला आहे.

अंजली भारद्वाज या दिल्लीत स्थायिक असून माहितीचा अधिकार राष्ट्रीय अभियानाच्या त्या संयोजक आहेत. या शिवाय अन्न अधिकार अभियान, न्यायव्यवस्था जबाबदेही अभियान यातही त्या सक्रीय आहेत. गेली ५ वर्षे त्या NAPM च्या राष्ट्रीय समन्वयक आहेत.

ॲड. आराधना भार्गव या मध्य प्रदेशातील लढाऊ कार्यकर्ता असून शेतकरी, महिला, दलित, आदिवासी यांच्या लढ्यात अग्रेसर असतात. कार्यकर्त्यांवरील केसेसही त्या लढवतात.

फादर आनंद मॅथ्यू हे उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे स्थायिक असून तेथील साझा सांस्कृतिक मंचाचे संयोजक आहेत. गेली ३० वर्षे सांस्कृतिक माध्यमातून जल, जंगल, जमीन तथा सामाजिक सौहार्द यासाठी कार्यरत आहेत. सध्या ते वाराणसी जवळ सौहार्द शांती केंद्र चालवत असून मोहल्ला–वस्ती–शाळा येथे शांती बैठका घेऊन धर्म – जाती वैमनस्य मिटवण्यासाठी काम करत असतात.

डॉ. गुलाम रसूल शेख हे जम्मू काश्मीर मध्ये श्रीनगर येथे स्थायिक असून माहितीचा अधिकार अभियान, जंगल अधिकार समन्वय आणि पर्यावरण संरक्षण आंदोलनात सक्रीय आहेत.

प्रफुल्ल सामंतरा, लिंगराज आझाद आणि लिंगराज प्रधान हे तिघे सहकारी उदीशात समाजवादी चळववळीतून सक्रीय झालेले वरिष्ठ सहकारी आहेत. उदीशात विनाशकारी प्रकल्प लादणारी वेदान्त कंपनी, अदानीसमूह यांच्या विरोधातील आदीवासी – शेतकरी – दलितांच्या लढ्यात हे सक्रीय आहेत. संयुक्त किसान मोर्चाचे उदीशातील कामात लिंगराज प्रधान आघाडीवर आहेत तर वन हक्क लढ्यात लिंगराज आझाद सक्रीय आहेत. प्रफुल्लदा नदी बचाओ व NAPM पर्यावरण संरक्षण मंचातही सक्रीय आहेत.

सौम्य दत्ता हे दिल्लीत स्थायिक असून पर्यावरण संरक्षणाच्या मुद्द्यावरील आंतर राष्ट्रीय स्तरावरील तज्ञ आहेत. हवामान बदल, तापमान वाढ आदी मुळे शेतकरी, आदिवासी, मच्छिमार आदी समूहांवर होणाऱ्या परिणामांबाबत जन जागृती साठी ते सतत प्रयत्नरत असतात. NAPM च्या या आधीच्या NWG मध्ये ते सक्रीय होते.

शाहीद कमाल हे बिहार मध्ये अनेक वर्षे समाजवादी चळवळीत सक्रीय असून NAPM शी सुरुवातीपासून संबंधित आहेत. राष्ट्र सेवा दलाच्या कामातही त्यांचा पुढाकार आहे.

आशीष रंजन हे बिहार मधील अररिय जिल्ह्यात जन जागरण शक्ति संगठन या गैरदलीय राजनीतिक संघटनेच्या माध्यमातून ग्रामीण मजदूर, महिला, विद्यार्थी यांच्यात गेली अनेक वर्षे काम करीत आहेत. NAPM चे ते अनेक वर्षे राष्ट्रीय समन्वयक आहेत.

सी. आर. नीलकंदन हे केरळातील सहकारी सुरुवातीपासून NAPM शी संबंधित आहेत. राज्यातील विविध पर्यावरण रक्षणाच्या लढ्यात ते सक्रीय आहेत. विनाशकारी के रेल, मानव – जनगळी पशू संघर्ष, विनाशकारी विमानतळ, मच्छिमार संघर्ष आदीत ते सक्रीय आहेत.

किरण विसा हे हैदराबाद येथी स्थायिक असून तेलंगणा आणि आंध्र प्रदेशहात रायतू स्वराज्य वेदिका या चळवळीच्या माध्यमातून शेतकरी, शेत मजूर यांची संघटना चालवतात. राष्ट्रीय स्तरावरील संयुक्त किसान मोर्चाच्या आंध्र व तेलंगणातील कामात त्यांचा पुढाकार असतो. राष्ट्रीय स्तरावरील आशा मंचाचे कामही ते करतात.

ॲड. पुरबायन चक्रवर्ती हे कोलकाता जवळ कार्यकर्ता सामूहिक निवासात रहातात. पश्चिम बंगाल खेत मजूर समितीच्या माध्यमातून ते ग्रामीण, चहा मळे कामगार, आणि असुरक्षित मजदूरांमध्ये काम करतात. अन्न अधिकार अभियान, रोजगार हमी अभियान या बरोबरच NAPM च्या NAJAR या वकिलांच्या समूहातही ते सक्रीय आहेत.

आशीष कोठारी हे उत्तराखंडात पर्यावरण संरक्षणाच्या

(पान ३६ वर)

MS-CIT ने केली किमया, दाखवली मला AI ची नवी दुनिया!
१० वी ते १२ वी आणि CBSE च्या विद्यार्थ्यांसाठी खास बॅचेस
MS-CIT मध्ये 100 AI Tools शिकून मी झाले 1000 पट स्मार्ट!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (AI) च्या युगात वावरण्याचा आत्मविश्वास!
mscit.mkcl.org
१० वी ते १२ वी आणि CBSE च्या विद्यार्थ्यांसाठी खास बॅचेस
MS-CIT मध्ये AI Tools चे शिक्षण
शासकीय सेवेत प्रवेशासाठी MS-CIT अनिवार्य
२४ वर्षांची समृद्ध शैक्षणिक परंपरा
१ कोटी ६५ लाखांहून अधिक विद्यार्थी
शिका २५०+ मूलभूत आणि ॲडव्हान्स स्किल्स
महाराष्ट्रातील ४५००+ अधिकृत केंद्रांमध्ये उपलब्ध
MSBTE आणि MKCL यांचे संयुक्त प्रमाणपत्र
करिअर आणि जॉब ओरिएंटेड क्लिक कोर्सेस।
MKCL KLiC Courses

(खास वृत्तांत: पान ३२ वरुन)

त्या निवडणूकींची काय प्रासंगिकता उरते? की केवळ त्या प्रदेशातील प्रभावी कार्य गटांचा हितसंबंध साध्य होतो हा प्रश्न आहे आणि या बाबतीत आपण विचार करायला हवा. जेव्हा आम्ही हे बोलतो तेव्हा बरेच जण बोलतात की ही फार दूरची गोष्ट आहे आणि हा एक युटोपिया आहे. खरं म्हणजे हे जे चालू आहे ते असेच चालू राहू दे असा विचार करणे हा मोठा युटोपिया आहे की जे चालू आहे त्याच्या समोर मोठं आव्हान आहे आणि हे एक दिवशी उन्मळून पडेल ह्या बाबत विचार करणं हा जास्त मोठा युटोपिया आहे याबाबत आम्हाला जरुर विचार करायला हवा.

शेवटी मी एवढंच सांगेन की माझी स्वत:ची जनआंदोलनांबद्दलची कटीबध्दता आहे की, जनआंदोलनांच्या सोबत आम्ही उभे राहू. सर्वोदयाच्या कामासाठी मी कायमच तुमच्या सोबत असेन. वेगवेगळ्या जनआंदोलनांच्या ज्या काही गोष्टी आहेत त्यांना ध्येय धोरणांपर्यंत घेऊन जायचं आहे; त्या लढाईतसुध्दा तुम्ही मला नेहमी तुमच्या सोबत बघाल. मला असंही वाटतं की अत्यंत विनयशिलतेने सांगायची ही वेळ आलेली आहे जेव्हा आधुनिकतेचा अर्थ, प्रगतीशीलतेचा अर्थ आहे catching up with Gandhi, catching up with Hind Swaraj! आणि ज्या दिवशी आम्हाला हे समजेल कदाचित तेव्हा आपण उपभोक्तावादी समाजाकडून वेगळे होऊन उत्पादकतावादी समाजाकडे वळू शकू. हा कर्मशील समाज जो आपल्या समाजाचा पाया होता, कदाचित आपण अशा समाजाच्या दिशेने पुढे जाऊ! जयजगत! जिंदाबाद! जौहार!

शब्दांकन: सिरत सातपुते

(खास वृत्तांत: पान ३४ वरुन)

वैकल्पिक निर्माण कामात सक्रीय आहेत. संघर्ष – निर्माण साथ साथ या धोरणानुसार वैकल्पिक रचनात्मक कामास वाहिलेल्या विकल्प संगम या मंचाचे कामही ते पहातात.

राजीव यादव हे उत्तर प्रदेशातील युवा झुझारू कार्यकर्ता असून शेतकरी आणि ग्रामीण समुहांच्या जमीन अधिकार आंदोलनात सक्रीय असतात.

युवराज गटकळ हे सध्या महाराष्ट्रात पुणे येथे स्थायिक असून सर्वोदयी चळवळीत गेली १७ वर्षे ते पूर्ण वेळ कार्यकर्ता आहेत. या आधी ते NAPM चे राज्य समन्वयक होते. मराठवाड्यातील ऊस तोड कामगार, पर्यावरण रक्षण, शेतकरी आंदोलन आणि सामाजिक सदभाव अभियानात ते सक्रीय असतात.

डॉ. संजय मंगला गोपाळ NAPM च्या प्रक्रीयेत सुरुवातीपासून सक्रीय आहेत. राष्ट्रीय सह संयोजक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. श्रमिक जनता संघ या असुरक्षित कामगारांच्या युनियनचे काम ते महाराष्ट्रात बघतात. साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात ते सक्रीय आहेत. ऊर्जा व पर्यावरण धोरण यात त्यांना विशेष आस्था आहे. ठाण्यात गरीब वस्त्यांमधील विद्यार्थी, युवा, महिला यांच्यात गेली ३० वर्षे ते शैक्षणिक – सामाजिक काम करीत आहेत.

ॲड. सलाउद्दीन शेख हे तेलंगणात असुरक्षित कामगार व गीग कामगारांना न्याय मिळवून देण्याच्या लढ्यात सक्रीय आहेत.

कॉ. फ्रँको हे हैदराबाद येथे स्थायिक असून अखिल भारतीय स्तरावरील बँक कर्मचारी संघटनेच्या कामात ते अनेक वर्षे नेतृत्व करीत आहेत.

‘शाश्वत विकास न्यास’च्या मालकीचा ‘आंदोलन-शाश्वत विकासासाठी’चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी ‘श्री गुरुकृपा प्रिंटर्स’ १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.

प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, ‘ए’ विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.

To